सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३०४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मिनी विधानसभेतही भाजप-महायुतीचा डंका

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०९ फेब्रुवारी : नगरपालिका, महानगरपालिका आणि आता जिल्हा परिषद- पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजप-शिवसेना महायुतीने चमकदार कामगिरी करीत दमदार विजय मिळवला आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. विशेष म्हणजे या निवडणुकीत उबाठा गटाला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता आलेली नाही. त्यामुळे आजवरचा हा त्यांचा सर्वात मानहानीकारक पराभव ठरला असून, ग्रामीण भागातील जनतेने ठाकरेंच्या नेतृत्त्वाला स्पष्ट नाकारले, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.**



छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितींसाठी या निवडणुका पार पडल्या. महापालिका निवडणुकीनंतर घसरत चाललेल्या मतदानाच्या टक्केवारीबद्दल चिंता व्यक्त होत असतानाच खेड्यापाड्यांतून म्हातारे-कोतारे, आयाबाया आणि तरुणाई मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याने आश्र्वासक चित्र दिसले. या निवडणुकीत तब्बल ६८.२८ टक्के मतदान झाले. त्यामुळे लढती अटीतटीच्या होतील, असे तर्क लावले जातात असताना, ग्रामीण मतदारांनी भाजप महायुतीला स्पष्ट कौल दिला.

उबाठा आणि काँग्रेसला जिल्हा परिषदेत एकही जागा जिंकता आली नाही. तर, पंचायत समितीतही त्यांची कामगिरी अत्यंत निराशाजनक राहिली. या निवडणुकीत भाजप राज्यातील नंबर एकचा पक्ष ठरला असून, भाजपची ग्रामीण भागातील पकड किती खोलवर रुजली आहे, हे स्पष्ट झाले आहे. भाजपनंतर एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांनी सरस कामगिरी केली आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदांपैकी आठ जिल्हा परिषदांवर भाजपने वर्चस्व मिळवले. शिवसेनेला तीन जिल्हा परिषदांमध्ये सत्ता मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेसला एका जिल्हा परिषदेत यश मिळाले आहे. काँग्रेसने कोल्हापूर आणि लातूरमध्ये चांगली कामगिरी केली असली, तरी त्यांना सत्तेसमीप जाण्याइतके संख्याबळ मिळाले नाही. दुसरीकडे उबाठा गटाला जिल्हा परिषदेत खातेही उघडता आलेले नाही. या पराभवामागे उबाठा गटाच्या वरिष्ठ नेतृत्वाची निष्क्रियता कारणीभूत ठरल्याचे मत व्यक्त केले जात आहे. उबाठाच्या एकाही बड्या नेत्याने या निवडणुकीत सक्रिय प्रचार केला नाही किंवा कार्यकर्त्यांना बळ दिले नाही. याचाच परिणाम निकालात दिसून आल्याचा टोला भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी लगावला आहे.

# महाराष्ट्रात लवकरच मतदार याद्यांची सखोल तपासणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय निवडणूक आयोगाने सध्या पाच राज्यांतील मतदारयाद्यांची सखोल तपासणीवर (एसआयआर) लक्ष केंद्रित केले नसून, महाराष्ट्र, झारखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरसह इतर १२ राज्यांमध्येही एसआयआर मोहीम राबवण्याची तयारी सुरू केली आहे. याचे काम मे २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र, झारखंड, जम्मू काश्मिर या राज्यातील विधानसभा निवडणुका पार पडून एक वर्षाहून अधिक काळ लोटला असला तरी, मतदारयांद्याबाबत सर्वसमान्य मतदारांनाही संभ्रम आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून एसआयआर मोहीम राबवताना, सध्या पश्र्चिम बंगाल, तामीळनाडू, केरळ या राज्यांतील राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणात विरोध होत असला तरी, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने काम सुरू ठेवले आहे. तसेच, निवडणूक आयोगाने पश्र्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुडुचेरी या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात आणली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मार्च २०२६ च्या पहिल्या आठवड्यात या राज्यांच्या निवडणूक तारखांची अधिकृत घोषणा होऊ शकते.




निवडणूक आयोगाच्या हालचालींवरून असे संकेत मिळत आहेत की, १५ फेब्रुवारीनंतर आयोगाची पथके या राज्यांचा दौरा सुरू करतील. मतदार यादीच्या पुनरीक्षणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, विविध राज्यांच्या अंतिम मतदार याद्या खालीलप्रमाणे प्रसिद्ध केल्या जातील: आसाम: १० फेब्रुवारी, बंगाल, केरळ, पुडुचेरी: १४ फेब्रुवारी, तामिळनाडू: १७ फेब्रुवारी या याद्या प्रसिद्ध झाल्यानंतरच प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली जाईल. विशेष म्हणजे, २०२१ मध्ये या राज्यांच्या निवडणुकांची घोषणा २६ फेब्रुवारीला करण्यात आली होती. या पाच राज्यांपैकी पश्र्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमध्ये सध्या विरोधी पक्षांची सरकारे आहेत, तर आसाम आणि पुडुचेरीमध्ये एनडीएची सत्ता आहे. त्यामुळे ही निवडणूक आगामी राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# जम्मू आणि हिमाचलमध्ये पाऊस बर्फवृष्टीची शक्यता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** हवामान खात्याने जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात हलका पाऊस आणि हिमवृष्टीचा इशारा दिला आहे. आयएमडीने म्हटले की, पश्र्चिमी विक्षोभाच्या प्रभावामुळे, ९ ते ११ फेब्रुवारी दरम्यान पश्र्चिम हिमालयीन प्रदेशात पाऊस आणि हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये दाट धुक्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात ऑरेंज अलर्ट आणि उत्तराखंडमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागातही दाट धुके दिसू शकते. पुढील ७ दिवसांत देशाच्या उर्वरित भागात कोणताही महत्त्वपूर्ण हवामान बदल होणार नाही.

पुढील दोन दिवसांत वायव्य भारतातील किमान तापमानात हळूहळू २ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानंतर, पुढील दोन दिवसांत ते सुमारे २ अंश सेल्सिअसने कमी होईल आणि त्यानंतर पुढील तीन दिवसांत कोणताही महत्त्वपूर्ण बदल होणार नाही.

**मध्यप्रदेश, महाराष्ट्रात हवामान कसे असेल?**

पुढील २४ तासांत मध्य भारतात किमान तापमानात कोणताही लक्षणीय बदल होणार नाही आणि त्यानंतर पुढील चार दिवसांत ते २-४ अंश सेल्सिअसने वाढू शकते. तसेच पुढील २४ तासात महाराष्ट्रात किमान तापमानात कोणताही लक्षणीय बदल होणार नाही.

९ ते १० फेब्रुवारी दरम्यान जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात हलका पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. पुढील आठवड्यात हवामानात कोणताही मोठा बदल होणार नाही.

**पंजाब-हरियाणामध्ये कडाक्याची थंडी**

रविवारी पंजाबच्या अनेक भागात कडाक्याची थंडी जाणवली, ज्यामध्ये फरीदकोट आणि होशियारपूरमध्ये किमान तापमान पाच अंश सेल्सिअस नोंदवले गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. भारतीय हवामान खात्यानुसार, पंजाबमधील इतर ठिकाणांसह, फिरोजपूरमध्ये किमान तापमान ५.६ अंश सेल्सिअस, अमृतसरमध्ये ५.७ अंश सेल्सिअस, बठिंडामध्ये ६.२ अंश सेल्सिअस, गुरुदासपूरमध्ये ७ अंश सेल्सिअस, लुधियानामध्ये ९.४ अंश सेल्सिअस आणि पटियालामध्ये ९.३ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पंजाब आणि हरियाणाची संयुक्त राजधानी असलेल्या चंदीगडमध्ये किमान तापमान आठ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हरियाणात, कर्नालमध्ये किमान तापमान ७.२ अंश सेल्सिअस, गुरुग्राममध्ये ८.१ अंश सेल्सिअस, नारनौलमध्ये ८.५ अंश सेल्सिअस, हिसारमध्ये ८.३ अंश सेल्सिअस, तर अंबालामध्ये किमान तापमान ९.२ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

# शरद पवार यांची प्रकृती स्थिर

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०९ फेब्रुवारी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांना खोकल्याचा त्रास होत असल्याची माहिती समोर आली आहे. सुरुवातीला शरद पवार यांच्यावर बारामतीत उपचार करण्यात आले. यानंतर डॉक्टांच्या सल्लयानुसार त्यांना पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांना आज दुपारी सव्वा तीन वाजेच्या सुमारास रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं. इथे दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी शरद पवार यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यानंतर डॉ. अभिजीत लोढा यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी शरद पवार यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.



शरद पवार यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांच्या छातीमध्ये थोडा कफ झाला आहे. त्यांना व्हेंटिलेटर किंवा ऑक्सिजनची गरज नाही. त्यांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. पुढील दोन-तीन तासांमध्ये रिपोर्ट येतील. त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल, असे डॉ. अभिजीत लोढा यांनी सांगितले. शरद पवार यांच्या शरीरातील ऑक्सिजन आणि हृदयाचे ठोके स्थिर आहेत. गेल्या काही दिवसात झालेल्या धावपळीमुळे आणि तणावामुळे थकवा आला आहे, असे देखील डॉक्टरांनी सांगितले.

# Epstein Files मध्ये नाव, ५ देशांमध्ये राजीनाम्यांचा सपाटा, बड्या राष्ट्राच्या प्रमुखाचा माफीनामा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एपस्टीन फाईल्स प्रकरणाचे पडसाद जगभर दिसून येत आहेत. त्यामुळे तब्बल ५ देशांमध्ये बडे नेते अधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहे. तर एका पंतप्रधानाने माफी मागितली आहे.

एपस्टीन फाईल्समधून समोर आलेल्या प्रकरणांमुळे जगभरात खळबळ उडाली आहे. अनेक राष्ट्रांमध्ये राजीनामा सत्र सुरू झाले आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, नॉर्वे, स्लोवाकिया या देशात देशांचा यात समावेश आहे. या फाईल्समध्ये जगातील अनेक देशांमधील अधिकाऱ्यांचे आणि नेत्यांचे अश्र्लील फोटो आणि व्हिडिओ मिळाले आहेत. अमेरिकेच्या न्याय विभागाने ट्रम्प सरकारच्या मंजूरीनंतर या फाईल्स जारी केल्या आहेत.

**पंतप्रधानांची माफी अन् खास व्यक्तीचा राजीनामा**



एपस्टीन फाईल्समध्ये ज्या अधिकारी आणि नेत्यांचे ईमेल, भेटी आणि पार्टीचे फोटो, दस्ताऐवज आणि आर्थिक व्यवहाराचे खुलासा झाला आहे. त्यावर प्रश्न उचलले जात आहे. यामध्ये काही जणांनी दबावात येत राजीनामा दिला आहे. ब्रिटनमध्ये पंतप्रधान कीर स्टारमरचे चीफ ऑफ स्टाफ मॉर्गन मॅकस्वीनी यांनी राजीनामा दिला आहे. कारण त्यांनी अमेरिकेतली ब्रिटनचे राजदूत म्हणून मँडेलसन यांची शिफारस केली होती. ज्यांचे नाव एपस्टीन फाईल्समध्ये आले होते. मॅक्सवीनी यांनी नैतिक जबाबदारी घेत पद सोडले होते. या प्रकरणीच ब्रिटनचे पंतप्रधान कीम स्टार्मर यांनी माफी मागितली आहे.


**बड्या नेत्यांचे राजीनामे**

एपस्टीन प्रकरणात घेतलेल्या चुकीच्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारत नॉर्वेतील वरिष्ठ अधिकारी, माजी मंत्री मोना जुल यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी इस्रायल, ब्रिटन आणि संयुक्त राष्ट्रांमध्ये नॉर्वेचे राजदूत म्हणूनही काम केले आहे. अमेरिकेतील एका प्रसिद्ध कायदा फर्मचे अध्यक्ष ब्रॅड कॉर्प यांनीही एपस्टिनशी ईमेल कनेक्शनमुळे राजीनामा दिला. नोव्हेंबर २०२५ मध्ये, लॅरी समर्स यांनी एपस्टीशनी आपले संबंध कबूल केल्यानंतर राजीनामा दिला. डिसेंबर २०२५ मध्ये, फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) चे उपसंचालक डॅन बोंझिनो यांनीही राजीनामा दिला.

## त्रिभाषा धोरण राबविण्यासंदर्भात नरेंद्र जाधव समितीकडून सरकारला अहवाल सादर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०९ फेब्रुवारी :** राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण राबविण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समितीनं आज आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. समितीचे अध्यक्ष नरेंद्र जाधव यांनी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे हा अहवाल सादर केला.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयाला झालेल्या विरोधानंतर राज्य सरकारनं शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीची घोषणा केली होती. या समितीकनं राज्यभरात दौरे करत राजकीय नेत्यांसह संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद कार्यक्रम, जनसुनावणी घेतली. त्यानंतर आता समितीनं हा अहवाल सरकारला सादर केला असून लवकरच हा अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे.

# भाजपमुळे संघाला नाही, तर संघामुळे भाजपला अच्छे दिन; मोहन भागवतांच्या वक्तव्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ०९ फेब्रुवारी :** 'भाजपमुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अच्छे दिन आले, असे नाही. उलट संघामुळे भाजपला अच्छे दिन आले. आम्ही लोकांसमोर जे मुद्दे मांडतो ते लोकांना आवडतात आणि तेच मुद्दे जो पक्ष घेतो, त्याला फायदा होतो. आम्ही राम मंदिरचा प्रश्न मांडला आणि भाजपने तो उचलून धरला म्हणून भाजपला केंद्रात यश मिळाले,' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी मुंबईत केले. त्याच वेळी 'पूर्वी केवळ ब्राह्मण लोकांची म्हटली जाणारी ही संघटना आता सर्व क्षेत्रांत, सर्वदूर, तळागाळापर्यंत पोहोचत आहे. देशाचा विकास घडवून विश्र्वस्तरावर मोठे होण्यासाठी प्रयत्न करणारच आहे,' असा निर्धारही भागवत यांनी व्यक्त केला.

संघाच्या शताब्दीनिमित्त कोकण प्रांताने मुंबईतील वरळी येथील नेहरू केंद्राच्या सभागृहात आयोजित केलेले 'संघ यात्रा के १०० वर्ष- नए क्षितिज' या विषयावरील सरसंघचालकांचे व्याख्यान शनिवारी झाल्यानंतर रविवारी प्रश्नोत्तराच्या सत्रांनी या कार्यक्रमाचा समारोप झाला. या वेळी मुंबईतील विविध क्षेत्रांतील नऊशेहून अधिक प्रतिष्ठित उपस्थित होते. उपस्थितांनी मांडलेल्या एकूण १४३ प्रश्नांचे १४ श्रेणींमध्ये वर्गीकरण करून संघाचे सुहास पोतदार यांनी ते भागवत यांच्यासमोर मांडले.

'भाजप, विहिंप, किसान मजदूर संघ इत्यादी संघटना स्वतंत्र व स्वायत्त आहेत. त्यांच्या स्वत:चे संघटन, समित्या, कार्यपद्धती आहेत. त्यांनी सल्ला, मार्गदर्शन मागितले तर आम्ही देतो. कारण ते मूळचे स्वयंसेवक आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे पुण्य त्यांच्याकडे राहते, पण त्यांचे पाप थोडे आमच्यावर येते, ते आम्ही घेतो. कारण ते मुळात इथून गेले. तेवढा धोका आम्ही पत्करतो, त्याला इलाज नाही', अशी भूमिका मांडताच हशा पिकला.




'स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अद्याप भारतरत्न का नाही,' या प्रश्नावर 'मी त्या समितीवर नाही. समितीचे कोणी भेटले तर मी त्यांना विचारेन; पण सावरकरांना भारतरत्न मिळाला तर त्या पुरस्काराचाच सन्मान वाढेल. ते सन्मानाविनाही लाखो, कोट्यवधी लोकांचे हृदयसम्राट आहेत', असे उत्तर सरसंघचालकांनी देताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

## थोडक्यात...

### उड्डाणपुलामुळे नागरिकांना धोका

**डोंबिवली :** डोंबिवलीमधील ठाणे आणि डोंबिवलीला जोडणारा मोठा गाव मानकोली उड्डाणपूल चार चाकी वाहनांच्या रेसिंगच्या अड्डा बनला आहे. चारचाकी चालकांच्या या जीवघेण्या शर्यतीमुळे अन्य वाहन चालक आणि नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. याबाबतीत कारवाईची मागणी भाजपचे दीपेश म्हात्रे यांनी केली आहे. डोंबिवलीमधील ठाणे - डोंबिवली प्रवास कमी वेळात व्हावा यासाठी कल्याण खाडीवर कोट्यवधी रुपये खर्च करून मोठा गाव मानकोली उड्डाणपूल तयार करण्यात आला. हजारोंच्या संख्येने ज्या उड्डाणपुलावर लोक दुचाकीने प्रवास करतात. हाच पूल मद्यपी आणि स्टंटबाज तरुणांचा अड्डा झाला आहे. स्टंटबाज तरुण या पुलावर हैदोस घालत असल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. या पुलावर दारू पार्टी तर सुरूच होती. मात्र आता या पुलावर चार चाकी गाड्यांच्या रेसिंग देखील सुरू झाली आहे. यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

### मतदानाहून परतताना अपघात

**महाड :** नुकताच जिल्हा परिषदेची निवडणूकमही पार पडली आहे. आणि आजच त्याचे निकालही लागले आहेत. त्यामुळे मतदानासाठी मुंबईहून गेलेले चाकरमानी परतीच्या प्रवासाला लागले. याचवेळी प्रवासात वरंधा घाटात एक अपघात झाला. मतदानासाठी मुंबईहून महाडला गेलेल्या चार जणांनी परत येताना मृत्यूला चुकवलं आहे. मृत्यूला चकवत कारमधून उड्या मारत आपले जीव वाचवले आहेत.भोर - महाड वरंधा घाटात ही घटना घडली. कार महाडवरून भोरच्या दिशेने येत होती. घाटात असलेल्या शिरगावचा हद्दीत एका धोकादायक वळणार येताच चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही घटना घडली.

### सोने-चांदीच्या दरात वाढ

**मुंबई:** आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. ऐन लग्नसराईमध्ये ही वाढ झाल्याने ग्राहकांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

कमकुवत डॉलर आणि चांगली स्पॉट डिमांड यामुळे आज, सोमवार ९ फेब्रुवारी रोजी चउद वर सोन्याच्या किंमती वाढल्या आहेत. सकाळी बाजार उघडताच एका तोळ्यासाठी आता १ लाख ५८ हजार ५०० रुपये मोजावे लागणार आहे. तसेच एक किलो चांदीची किंमत तब्बल २ लाख ६१ हजार ८७० रुपये झाली आहे.

सोन्या चांदीसह प्लॅटिनम आणि पॅलेडियम यांच्या दरात देखील वाढ झाली आहे.

### आगीत एका महिलेचा मृत्यू

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकींचा निकाल समोर येत आहे. अनेक ठिकाणी विजयी उमेदवारांकडून विजयाचा गुलाल उधळला जात आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या निकालावर वेगवेगळ्या पक्षाचे दिग्गज नेते आपापली प्रतिक्रिया देत आहेत. विजय किंवा पराभवामागचे विश्र्लेषण करत आहे. निवडणुकीचा हा धुराळा सुरु असताना मुंबईच्या विलेपार्ले परिसरात अतिशय दुर्देवी घटना घडली आहे. मुंबईतील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक जीतू सत्रा यांच्या इमारतीला आज सकाळी भीषण आग लागली. या आगीत सत्रा कुटुंबातील एका महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. बांधकाम व्यवसायिक जीतू सत्रा यांच्या विलेपार्ले येथील इमारतीला आज सकाळी भीषण आग लागली होती.

### नव्या कर प्रणालीचा प्रस्ताव

**मुंबई :** आता वाहतूक कोंडीच्या क्षेत्रात गाडी घेऊन गेल्यावर मुंबईकरांना कर भरावा लागण्याची शक्यता आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी एक नवा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. लंडन आणि सिंगापूरसारखी एक नवी करप्रणाली सुरू करण्याचा प्रस्ताव भाजपचे नगरसवेक मकरंद नारवेकर यांनी मांडला आहे.

### ३१ मार्चपर्यंत समूळ नायनाट करणार

**रायपूर :** केंद्र सरकारच्या सुरक्षा-केंद्रित रणनीतीमुळे आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे डाव्या उग्रवादाविरोधातील लढाई निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून, येत्या ३१ मार्चपूर्वी नक्षलवादाचा पूर्णपणे बिमोड केला जाईल, असा ठाम विश्र्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी येथे व्यक्त केला.छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे आयोजित एका उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. नक्षलवाद संपवण्यासाठी केंद्र सरकारने निश्र्चित केलेल्या ३१ मार्चच्या डेडलाईनच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२६ ची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** 'Z'तर्फे मारुती सुझुकी प्रस्तुत २४व्या झी सिने अ‍ॅवॉर्ड्स २०२६ ची अधिकृत घोषणा करण्यात आली. यंदा 'फॅन्टर्टेनमेंट' संकल्पनेला 'यह पल है फॅन्स का' या नव्या टप्प्यावर नेत चाहत्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात येणार आहे. मुंबईतील पत्रकार परिषदेत अक्षय कुमार, तमन्ना भाटिया, जॅकलिन फर्नांडिस, सोनम बाजवा, अपारशक्ती खुराणा, मिथून आणि पलक मुच्छल उपस्थित होते. कलाकार-चाहते नाते अधिक दृढ करणे हा उद्देश आहे. हा सोहळा २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी एनएस-सीआय डोम, मुंबई येथे होईल. प्रक्षेपण झी टीव्ही, झी सिनेमा आणि झी ५ वर.

### 'एकत्रितपणाचे क्षण' - आता अधिकृतपणे प्रमाणित

**नाशिक :** नेस्ले इंडिया भारतातील मॅगीच्या ५० वर्षांचा उत्सव साजरा करताना एक स्मरणीय पोस्टल स्टँप लॉन्च करताना आनंदित आहे. हा स्टँप श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया, आणि श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. हा स्टँप मॅगीच्या उत्क्रांतीला, नेहमीच नवकल्पनांसोबत पुढे राहण्याला आणि एका खूपच आवडत्या श्रेणीशी जोडलेल्या अनुभवांना सन्मान देतो - तसेच पिढ्यांमधून लोकांना एकत्र आणत राहतो, एकमेकांसोबत एकत्रित क्षण साजरे करत राहतो.गेल्या पाच दशकांमध्ये, मॅगी भारतीय घरांमध्ये अनेक स्वादिष्ट रूपांमध्ये पोहोचले आहे - नूडल्स आणि मसालेपासून सॉस, सूप आणि रेडी-टू-कुक आवडत्या पदार्थांपर्यंत. जलद एकट्या जेवणापासून ते संपूर्ण कुटुंब एकत्र आणणाऱ्या जेवणांपर्यंत, आणि हॉस्टेलच्या स्वयंपाकघरांपासून ते मोठ्या जमावांपर्यंत, मॅगी देशभरातील असंख्य खाद्य क्षणांचा भाग राहिले आहे. ५० वर्षांचे एकत्रितपण स्टँप या सामायिक अनुभवांना सन्मान देतो, आणि मॅगी भारतभरातील टेबल्सवर आणत असलेल्या उब, आराम आणि संबंधांचे चित्रण करतो.

### माझा जीवशास्त्राचा शैक्षणिक पार्श्वभूमी अभिनय करताना उपयोगी पडेल

**मुंबई:** अग्रगण्य कौटुंबिक मनोरंजन वाहिनी सोनी सब लवकरच आपली वैद्यकीय मालिका हुई गुम यादें - एक डॉक्टर, दो जिंदगीयाँ सादर करत आहे. ही मालिका जागतिक स्तरावर प्रशंसित इटालियन मालिका डीओसी ची भारतीय रूपांतरित आवृत्ती आहे. जीवनातील दुसऱ्या संधी आणि ओळख या विषयावर आधारित ही कथा डॉ. देव (इकबाल खान) यांच्या असामान्य प्रवासाचे चित्रण करते, जे एका अपघातात आठ वर्षांची स्मृती गमावतात आणि त्यानंतर त्यांना आपले जग पुन्हा उभारावे लागते.

# सोयगावात कमळ फुलले; जिल्हा परिषदेवर महायुतीची दावेदारी प्रबळ

## वडगाव कोल्हाटीत अवघ्या एका मताने थरारक विजय; सांयकाळपर्यंतचे कल महायुतीच्या बाजूने

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी आज (सोमवारी) सकाळी सुरू झाली असून, दुपारनंतर आलेल्या निकालांमध्ये भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मुसंडी मारल्याचे चित्र आहे. विशेषतः सोयगाव तालुक्यात भाजपने विरोधकांचा पूर्णपणे सुपडा साफ करत निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे, तर वडगाव कोल्हाटी येथे एका अपक्ष उमेदवाराने अवघ्या एका मताने विजय मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

जिल्ह्यातील ६२ जिल्हा परिषद गट आणि १२४ पंचायत समिती गणांसाठी झालेली चुरशीची लढत आणि ७२.६९ टक्के झालेले विक्रमी मतदान कोणाच्या पथ्यावर पडणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सायंकाळी ५ वाजेपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार, जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणात महायुतीचे पारडे जड असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**सोयगावात भाजपचा 'क्लिन स्वीप'**

सोयगाव तालुक्यात राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार आणि भाजपची रणनीती यशस्वी ठरली आहे. येथील जिल्हा परिषदेच्या सर्व ६ जागांवर आणि पंचायत समितीच्या १२ च्या १२ जागांवर भाजपने विजय मिळवत 'क्लिन स्वीप' केला आहे. सोयगावमधील फर्दापूर गटातून भाजप अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या कन्या माहीन मुलतानी यांनी तब्बल ४ हजार ७३१ मताधिक्याने दणदणीत विजय नोंदवला. महाविकास आघाडीला या तालुक्यात खातेही उघडता आले नाही.




**वडगाव कोल्हाटीत एका मताचा थरार**

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वडगाव कोल्हाटी जिल्हा परिषद गटात निवडणुकीचा सर्वात रोमांचक निकाल पाहायला मिळाला. येथे अपक्ष उमेदवार सचिन गरड आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यामध्ये शेवटच्या फेरीपर्यंत अटीतटीची लढत झाली. अखेर गरड यांनी केवळ १ मताने ऐतिहासिक विजय मिळवला. या निकालाची जिल्हाभर चर्चा सुरू आहे.

**महायुतीचा अध्यक्ष होणार : सावे**

दरम्यान, निकालांचे कल पाहून गृहनिर्माण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आनंद व्यक्त केला आहे. ग्रामीण जनतेने विकासाला कौल दिला असून, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेवर महायुतीचाच अध्यक्ष विराजमान होईल, असा दावा त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

सद्यस्थितीत फुलंब्री, पैठण आणि वैजापूर तालुक्यांत मतमोजणीच्या अंतिम फेऱ्या सुरू असून, तेथे महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काँटे की टक्कर पाहायला मिळत आहे. रात्री उशिरापर्यंत संपूर्ण चित्र स्पष्ट होईल, मात्र सोयगावच्या निकालाने महायुतीचा आत्मविश्वास दुप्पट झाला आहे.



सोयगाव - आमखेडा गट मध्ये पुष्पाताई प्रकाश काळे यांची जिल्हा परिषद सदस्या पदी निवडून आल्याबद्दल भाजपा पदाधिकारी सत्कार करताना..

# 'बालभारती गीत'ने जागवल्या बालपणाच्या गोड आठवणी



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ फेब्रुवारी :** बालभारतीच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त साकारलेले 'बालभारती गीत' हे भावस्पर्शी गीत प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. अनेक पिढ्यांच्या बालपणाचा अविभाज्य भाग ठरलेल्या बालभारतीच्या पुस्तकांशी निगडित आठवणी, संस्कार आणि भावविश्र्व या गीतातून प्रभावीपणे उलगडण्यात आले आहे.

या गीताला लोकप्रिय गायिका वैशाली सामंत यांचा आवाज लाभला असून संगीतकार अवधूत गुप्ते यांचे संगीत आणि दासू वैद्य यांचे शब्द लाभले आहेत. बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांचे मार्गदर्शन या प्रकल्पाला लाभले असून संकल्पना 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांची आहे.

बालभारतीचे नाव घेताच आठवणारा पुस्तकांचा सुगंध, मुखपृष्ठांवरील बोलकी चित्रं आणि कवितांमधून मिळालेली भाषेची पहिली ओळख या भावना गीतातून जिवंत होतात. एकवीरा म्युझिकवर हे गीत उपलब्ध असून युट्युब चॅनेलवर त्याचे सादरीकरण पाहता येत आहे. बालपणाच्या निरागस आठवणींना उजाळा देणारा हा सांगीतिक उपक्रम रसिकांच्या मनात घर करेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पैठणला शिवसेनेचा दणदणीत विजय

## जिल्हा परिषद ९ पैकी ८; पंचायत समिती १८ पैकी १७ जागा ताब्यात

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०९ फेब्रुवारी :** खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भूमरे यांच्या मार्गदर्शनाखाली पैठणला शिवसेना शिंदे गटाने दणदणीत विजय मिळवला असून जिल्हा परिषदेच्या ९ पैकी ८ तसेच पंचायत समिती १८ पैकी १७ जागा ताब्यात घेतल्या आहेत. या निवडणूकित राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस भाजपा पुरुस्कृत पॅनलचा सुपडासाफ झाला आहे. बीडकीन गटात उबाठा शिवसेनेचे मनोज पा. पेरे तर एकतुनी गणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या योगिता कोठुळे या निवडून आल्या आहेत. तर माजी आमदार संजय वाघचौरे यांच्या पत्नी सुनीता वाघचौरे, विनोद तांबे, ज्ञानेश्र्वर कापसे, डॉ सुनील शिंदे यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.




विजयी उमेदवार चितेगांव गट कृष्णा गिधाने शिवसेना, बीडकीन गट मनोज पेरे उ.बा.ठा, आडुळ गट रुपाली तवार शिवसेना, पाचोड गटात युवा नेतृत्व शिवराज भुमरे शिवसेना, दावरवाडी गटात जयश्री वाघामोडे शिवसेना, ढोरकिन सविता जगताप शिवसेना, पिंपळवाडी गटात कारभारी लोहकरे शिवसेना, विहामंडवा गटात नितीन तांबे शिवसेना, नवगांव गटात पांडुरंग औटे शिवसेना, चितेगांव गण, प्रियंका भुजंग शिवसेना, रांजनगांव खुरी गणात संजय लघाने शिवसेना बीडकीन गण अक्षय गवारे शिवसेना, निलजगांव गण उमेदवार सविता आडे शिवसेना, आडुळ कशाबाई कोल्हे शिवसेना, बालानगर गणात नर्मदा नलावडे शिवसेना, पाचोड गण अलका गोजरे शिवसेना, एकतुनी गणात छाया कोठुळे राष्ट्रवादी काँग्रेस, दावरवाडी गणात राहिबाई वाघ शिवसेना, नांदर गण उदयसेन काळे शिवसेना ढोरकिन गणात वैशाली बोंबले शिवसेना, लोहगांव गणात अलका शेळके शिवसेना पिंपळवाडी पिराची गणात दादासाहेब गलांडे शिवसेना, मुधळवाडी गणात भारत मुकुटमल शिवसेना, विहामांडवा गणात , प्रमोद पान्हाळकर शिवसेना, केकद जळगाव गणात प्रदीप नरके शिवसेना, नवगांव गणात दत्तात्रय गायके शिवसेना चांगतपुरी गणातील सकूबाई झारगड शिवसेना या उमेदवार विजयी झाले आहे.

# सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आज नाशिक दौऱ्यावर

## मालसणे येथे 'पंचपरमेष्ठी मंडपम'चे करणार उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत उद्या मंगळवारी (१० फेब्रुवारी) नाशिक जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते मालसणे (णमोकार) येथे आयोजित एका विशेष धार्मिक सोहळ्याला उपस्थित राहून आशीर्वचन देणार आहेत.

मालसणे (णमोकार) येथे मंगळवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात 'पंचपरमेष्ठी मंडपम'चे उद्घाटन सरसंघचालकांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ते नूतन 'समवशरण मंदिराचे' दर्शन घेतील. या सोहळ्यासाठी जैन धर्मीय बांधवांसह शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



कार्यक्रमात डॉ. मोहन भागवत आशीर्वचन देणार आहेत. सरसंघचालकांच्या आगमनामुळे मालसणे परिसरात उत्साहाचे वातावरण असून, प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्ह्यातील संघ कार्यकर्त्यांच्या भेटी आणि काही बैठकांमध्येही सरसंघचालक सहभागी होणार आहेत.

राजस्थानचे राज्यपाल तथा संभाजीनगरचे भूमिपुत्र हरीभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत

# 'दरमहा एक उपवास' अभियानाचा शुभारंभ; २ लाख लोकांचा संकल्प



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ फेब्रुवारी :** राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये प्रथमच 'हर माह एक उपवास' (दरमहा एक उपवास) या अनोख्या आणि आध्यात्मिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. आचार्य प्रसन्न सागर महाराज यांच्या सान्निध्यात पार पडलेल्या या सोहळ्यात सुमारे २ लाख भाविकांनी दर महिन्याला एक दिवस उपवास ठेवण्याचा सामूहिक संकल्प केला. जवाहर सर्कल येथील एंटरटेनमेंट पॅराडाइजमध्ये संपन्न झालेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमाला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे आणि मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लावली. या अभियानाची सुरुवात नवी दिल्लीतून झाली असून, गुरगाव नंतर जयपूर हे अशा प्रकारच्या सामूहिक उपवासाचे साक्षीदार बनणारे देशातील दुसरे शहर ठरले आहे.

या प्रसंगी मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी जैन मुनींच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, भारतीय संस्कृतीत संतांनी नेहमीच समाजाला योग्य मार्ग दाखवला आहे. जैन मुनी आपल्या कठोर तपश्र्चर्येने आणि संयमाने जनमानसात आध्यात्मिक चैतन्य निर्माण करतात. आचार्य प्रसन्न सागर महाराजांचे जयपूरमधील वास्तव्य हे शहरासाठी भाग्याचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी आचार्यांनी मुख्यमंत्र्यांना आपले 'दिव्य मंगल भक्ती पाठ' हे पुस्तक भेट दिले. कार्यक्रमाला आयोजन समितीचे अध्यक्ष राजीव जैन, महामंत्री आलोक जैन यांच्यासह मोठ्या संख्येने लोकप्रतिनिधी आणि भाविक उपस्थित होते. या ऐतिहासिक मोहिमेला जन-जनपर्यंत पोहोचवण्यासाठी जैन समाजाने पुढाकार घेतला आहे.

उपवासाचे महत्त्व विशद करताना आचार्य प्रसन्न सागर महाराज म्हणाले की, उपवास म्हणजे केवळ अन्नत्याग नसून तो स्वतःच्या आत्म्याच्या जवळ राहण्याचा (उप+वास) मार्ग आहे. धावपळीच्या जगात मानसिक शांती आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी उपवास अत्यंत प्रभावी ठरतो. त्यांनी स्पष्ट केले की, उपवासाच्या काळात मनात क्रोध किंवा ईर्ष्या असेल तर तो केवळ 'लंगण' ठरतो; खऱ्या उपवासात मन सात्विक असणे आणि वेळ जप-तपात घालवणे आवश्यक आहे. उपवास हा शरीराला निरोगी ठेवणारा वैद्य आणि आत्मा व परमात्मा यांना जोडणारा सेतू असल्याचे सांगत त्यांनी तरुणांना आत्मसंयमाचा हा मार्ग अवलंबण्याचे आवाहन केले. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल अभिजीत हिरप यानी दिली आहे

# निवृत्त महाबँक कर्मचाऱ्यांचा वार्षिक मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०९ फेब्रुवारी :** बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज ऑर्गनायझेशन या संघटनेच्या छ.संभाजीनगर विभागाच्या सभासदांचा वार्षिक मेळावा रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी उस्मानपुरा येथील श्रीनिधी सभागृहात उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून कैलासजी चांदीवाल (मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती) यांची उपस्थिती होती तर संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे पदाधिकारी पुण्याहून सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठी खास आले होते.




कार्यक्रमाची सुरुवात दिलीप देशपांडे यांनी गायलेल्या श्रमिक गीताने झाली. त्यानंतर, गेल्या वर्षभरात संघटनेच्या ज्या सभासदांचे निधन झाले त्यांना तसेच नुकतेच विमान अपघातात मृत्यु झालेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. व्यासपीठावरील मान्यवरांचा शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सत्कार करण्यात आला.

विभागाचे उपाध्यक्ष सुरेश कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर विभागीय सचिव रामराजा कुलकर्णी यांनी गत वर्षभराच्या संघटनेच्या कामकाजाचा अहवाल सादर केला. गेल्या वर्षभरात संघटनेत दाखल झालेल्या नवीन सभासदांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले, तर वयाच्या पंचाहत्तरीत पदार्पण करणाऱ्या तसेच वयाची ८० वर्ष पूर्ण करणाऱ्या सभासदांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. एका सभासदाचे कुटुंबीय - सर्वश्री सुशील आणि मंदार संवत्सर या शास्त्रज्ञ पितापुत्रांनी मिळवलेल्या २२ व्या पेटंटबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अजून एक सभासद डॉ. जयंत शेवतेकर यांना नृत्य, नाट्य, अभिनय इ. क्षेत्रातील त्यांच्या कार्याबद्दल त्यांना मिळालेल्या विविध शासकीय बहुमाना बद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. एक सभासद - मीना महर्षी- यांचा नातू अर्णव याला त्याने बनवलेल्या पॅरलिसिसग्रस्त रुग्णांना उपयोगी उपकरणांसाठी राष्ट्रपतींचा बाल वीर पुरस्कार मिळाला प्रमुख पाहुणे न्या.चांदीवाल यांनी आपल्या मनोगतात संघटना करीत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल विशेष कौतुक केले आणि यापुढेही हे कार्य चालुच ठेवावे असे मत व्यक्त केले.

सर्वश्री नारायण अचलेरकर- सरचिटणीस, उपाध्यक्ष चंद्रशेखर बारगजे आणि उपसरचिटणीस मधुसूदन निमकर या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सभासद संख्या वाढ, पेन्शन अपडेशन, मेडीक्लेम पॉलिसिज,क्लेम सेटलमेंट इ. विषयी विविध पातळ्यांवर चालू असलेल्या कामाविषयी आणि त्यातील प्रगती विषयी सभासदांना अवगत केले. अध्यक्ष मोहन घळवे यांनी संघटनेच्या एकंदर कार्याचा धावता आढावा घेतला. मनोज को-हाळे यांच्या आभार प्रदर्शनाने मेळाव्याची सांगता झाली.

**जाहीर नोटीस**

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव,यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. २२/२०२६

अर्जदार:-

१) श्रीमती सुमित्राबाई खुशाल राठोड वय-५६ वर्षे, धंदा-गृहिणी, २) श्री. जितेश खुशाल राठोड,वय-२७ वर्षे धंदा-शेती व नोकरी, ३) पल्लवी खुशाल राठोड लम्नानंतरचे नाव पल्लवी सुनिल जाधव,वय. ३१ वर्षे, धंदा-गृहिणी, ४)आदित्य खुशाल राठोड,वय-२६ वर्षे, धंदा-शेती सर्व राहणार हनुमंतखेडा ता.सोयगाव, जिल्हा संभाजीनगर

कोणीही नाही

विरुद्ध - कोणीही नाही

सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल खुशाल अमरु राठोड रा. हनुमंतखेडा ता. सोयगाव जिल्हा. छत्रपती संभाजीनगर यांचे दि. १५/०४/२०२५ रोजी श्रीराम क्रिटीकल केअर पाचोरा येथे निधन झालेले आहे त्यांचे पश्र्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ प्रमाणे ड. श्री. तन्मय सुनिल जैन यांच्यामार्फत अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा खुशाल अमरु राठोड यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. २०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता.०९/०२/२०२६

**लिपीक**
**सि.ज.ज्यु.डि.सो.सोयगाव**
**सहाय्यक अधीक्षक**
**सि.ज.ज्यु.डि.सो.सोयगाव**

प्रत रवाना-

१). मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर सोयगाव यांचे नोटीस बोर्ड.

२)ग्रामपंचायत कार्यालय, हनुमंतखेडा, तालुका-सोयगाव, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर,

**जाहीर प्रगटन**

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

पुढील तारीख: ०६/०३/२०२६

दि.कि. अर्ज क्र. ४९/२०२६

अर्जदार : १) इरफान पी. मुनोर शेख, वय ४४, व्यवसाय शेती, रु. हिवरखेडा (नाही), ता. कन्नड, जिल्हा. औरंगाबाद, २) शफीक पी.एस. मुनीर शेख, वय ६८, व्यवसाय. शेती, रु. हिवरखेडा (नाही), ता. कन्नड, जिल्हा. औरंगाबाद, ३)शकील पी. मुनीर शेख, वय ६२ वर्षे, व्यवसाय: शेती, आर. हिवरखेडा (नाही), ता. कन्नड, जिल्हा. औरंगाबाद, ४) इलियास पी. मुनीर शेख, ३७, कृषी, रु. हिवरखेडा (ना.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ५) रियाज पी. मुनीर शेख, वय ४०, शेती करतात, रु. हिवरखेडा (नाही), ता. कन्नड, जिल्हा. औरंगाबाद. ६) शबाना भ. महेमुद शेख, वय ४१, घरी काम, रु. टाकळी, औरंगाबाद, ता. मी औरंगाबाद, ७) रजियाबी ब्र. आयुष शेख, वय ५६, व्यवसाय घरकाम, रु. झोपडपट्टी पिशोर, ता. कन्नड, जिल्हा. औरंगाबाद, ८) रेहानाबी ब्र. पाशू शेख, वय ५१, घरी काम, रु. वानेगाव (खु), ता. फुलब्री, जि. औरंगाबाद,

विरुध्द

निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील अ‍ॅड. मोहंमद इकबाल यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ८ यांचे वडील नामे मुनीर दगडु शेख हे दि. ३०/११/२०१९ रोजी मौजे हिवरखेडा (नां), ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अजांसोबत दिलेले आहे. मयत मुनीर दगडु शेख यांना अर्जदार क्र. १ ते ८ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. ०५/०२/२०२६

**कनिष्ठ लिपीक**

**आदेशावरुन**

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड,**

# परभणी जि.प.निकाल त्रिशंकू

## वरपूडकरांची गढी ढासाळली, भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी ठरली गेमचेंजर ठरणार





**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हा परिषदेच्या दुपारी तीन वाजेपर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न देता त्रिंशकू अशी स्थिती निर्माण केली आहे. ५४ जागांच्या हरिपाठांमध्ये भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट प्रत्येकी १५ जागेसह सर्वात मोठे पक्ष ठरले असले तरी सतेची पायरी ठरण्यासाठी या दोन्ही पक्षांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

महायुती व महाविकास आघाडीचे घटक पक्ष स्वतंत्र लढण्याने त्यांची अवस्था खराब झाली आहे. या निवडणूकीत सर्वात मोठा धक्का भाजपात आलेले ज्येष्ठ नेते सुरेश वरपूडकर यांना बसला आहे. वरपूडकर यांच्या घरातील सर्व राजकीय वारसदारांना मतदारांनी बाहेरचा रस्ता दाखविला आहे. सिंगणापूर मधून मुलगा समशेर वरपूडकर तर सुनबाई प्रेरणा वरपूडकर या भाजपाच्या तिकीटावर दैठणा येथून पराभुत झाल्या आहेत. इतकेच काय तर झरीतून उबाठा गटाकडून नशिब आजमावणाऱ्या त्यांच्या कन्या सोनल देशमुख या देखील पराभुत झाल्या आहेत. या निवडणूकीत वरपूडकरांचे पुतणे अजित वरपूडकर हे लोहगाव सर्कलमधून काँग्रेसच्या तिकिटावर निवडूण आल्याने




त्यांच्यावर विजयाने घराणेशाहीच ी अब्रु वाचली आहे. त्यांनी चुलतभाऊ बोनी वरपूडकर यांचाच पराभव केल्याने वरपूडकर विरुध्द वरपूडकर या युध्दात घराणेशाहीची ताकद विभागली आहे.

कोणत्याही एका गटाला बहुमत नसल्याने भाजप आणि अजित पवार गटाची युती झाल्यास आकडा ३० पर्यंत जातो. परंतू यांचे हेवेदावे पाहता अपक्षांना मोठी किंमत येणार आहे. तोडातोडीचे राजकारण होण्याची दाट शक्यता आहे. वरपूडकरांच्या घडीला लागलेली घरघर आणि विखुरलेला जनादेश यामुळे परभणीचे राजकारण नव्या वळणावर आले आहे. विजयाचा गुलाल कोणाच्या अंगावर पडणार हे काही दिवसानंतर स्पष्ट होणार आहे. या निवडणूकीमध्ये भारतीय जनता पक्षास व राष्ट्रवादीस यश चांगले मिळाले आहे.

# पाथरीत चार गटात राकाँ तर एका ठिकाणी शिवसेनेचा विजय;पंचायत समिती त्रिशंकू

**पाथरी,/प्रतिनिधी:-** तालुक्यातील पाच जिल्हापरिषद गटाचा निकाल जाहिर झाला असून चार गटात राकाँने बाजी मारली तर एका ठिकाणी शिवसेना शिंदे गटाने निसटता विजय मिळवला. पंचायत समिती त्रिशंकू स्थिती निर्माण झाली.

तालुक्यातील लिंबा गटात राकाँच्या रुक्मिन पंडितराव भोसले विजयी झाल्या त्यांना ५५५१ मते मिळाली तर काँग्रेसचे दत्तात्रय मायंदळे यांना ४९९१ मते मिळाली. बाभळगाव गटात राकाँच्या वैजंताबाई आण्णासाहेब रणेर यांना ३४३७ तर शिवसेना उबाठाच्या डॉ मोनिका राम शिंदे यांना ३४०१ मते मिळाली अवघ्या ३६ मतांनी रणेर या विजयी झाल्या. कासापुरी गटात राकाँचे अरुण ज्ञानेश्वर कोल्हे हे विजयी झाले त्यांना ३८३८ तर काँग्रेसच्या जनाबाई तुळशीराम वाकनकर यांना ३२८३ मते मिळाली. देवनांद्रा गटात शिवसेनेच्या सुमन चक्रधर उगले या विजयी झाल्या त्यांना ३०३० मते मिळाली तर अपक्ष पुजा विक्रम गायकवाड यांना २९०९ मते मिळाली. हादगान गटात राकाँचे अजिंक्य अनिलराव नखाते यांना ६१३३ तर शिवसेना उबाठाचे सरेश उत्तमराव ढगे यांना ५६८१ मते मिळाली. हादगाव पंचायत समितीत राकाँच्या रोहिनी नागोराव ढगे यांना २८३१ तर पराभूत महानंदा प्रल्हादराव नखाते यांना २०४९ मते मिळाली.रेणाखळी पंचायत समिती गणात राकाँच्या सुनिता गजेंद्र डुकरे विजयी यांना ३२४९ तर पराभूत जनाबाई घनशाम डुकरे यांना २४०९ , लिंबा प सं गणात राकाँच्या विजयी विद्या भगवान दुगाने यांना २५१५ तर पराभूत सुनिता बबन पवार यांना २१५४, वाघाळा गणात विजयी राकाँचे सचीन लिंबाजी अंबुरे यांना ३०४८ तर पराभूत प्रकाश अवचार यांना २४४२ , कासापुरी गणात काँग्रेसच्या विजयी सतुबाई आप्पासाहेब घांडगे यांना १७४४ तर पराभूत उबाठाच्या ज्योती धोंडीराम कोल्हे यांना १४५६, रामपुरी गणात उबाठा शिवसेनेचे ज्ञानेश्वर गंगाधर शिंदे यांना २६६४ तर पराभूत बाबासाहेब माधवराव गिराम यांना १५६७, देवनांद्रा गणात विजयी काँग्रेसच्या प्रयागबाई बालासाहेब टेंगसे यांना २३२१ तर पराभूत कोमल राजेश टेंगसे यांना २२६७ ,देवेगाव गणात विजयी शिवसेनेचे निशा पवन लालझरे २३४२ तर पराभूत शालनबाई लक्ष्मण धनले १२११, बाभळगाव गणात विजयी उबाठाचे श्रीधर किशनराव गिराम २०२७ तर पराभूत सारीका गजानन वाघमारे १८५५, कान्सूर गणात विजयी उबाठा शिवसेनेच्या मनिषा मुंजाजी कोल्हे १९२० तर पराभूत अनिल सुभाषराव कोल्हे १६४६ पंचायत समितीच्या दहा गणां मध्ये राकाँ ४, शिवसेना उबाठा ३, काँग्रेस २, तर एका ठिकाणी शिंवसेना शिंदे गटाने विजय मिळवल्याने त्रिशंकू स्थिती झाली आहे.

# सोनपेठ तालुक्यात राष्ट्रवादीचाच बोलबाला

## भाजपाचा जि.प. व पं.स. मध्ये प्रत्येकी एक उमेदवार विजयी



**सोनपेठ,/प्रतिनिधी :** तालुक्यातील तीन जिल्हा परिषद मतदार संघापैकी दोन ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे उमेदवार विजयी झाले असून एका जागेवर भाजपाने विजय मिळवला आहे.तसेच सहा पंचायत समिती मतदार संघापैकी पाच जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चा विजय झाला असून एका जागेवर भाजपाचा सदस्य निवडून आला आहे. ईतर कोणत्याही पक्षाला आपलं खातं उघडता आले नाही.

अतिशय अटीतटीच्या लढतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा आ. राजेश विटेकर यांना सोनपेठ तालुक्यात मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे.सोनपेठ तालुक्यात शेळगाव,उखळी आणि नरवाडी असे एकूण तीन जिल्हा परिषद सर्कल आहेत तर शेळगाव,शिर्शी, नरवाडी, वडगाव, डिघोळ ई व उखळी असे एकूण सहा पंचायत समिती चे गण आहेत. यामधून विजयी उमेदवार खालील प्रमाणे आहेत. नरवाडी जिल्हा परिषद मधून विद्याताई धोंडगे (भाजपा), उखळी जिल्हा परिषद मधून माया मुजमूले (राष्ट्रवादी), शेळगाव जिल्हा परिषद मधून ॲड. श्रीकांत विटेकर (राष्ट्रवादी) हे निवडून आले आहेत. तर शेळगाव पंचायत समिती मधून पद्मसिंह देशमुख (राष्ट्रवादी), शिर्शी बु. पंचायत समिती मधून कस्तुराबाई भंडारे, (राष्ट्रवादी), नरवाडी पंचायत समिती मधून अनिकेत यादव (राष्ट्रवादी), वडगाव पंचायत समिती मधून जयप्रकाश बचाटे (भाजपा), उखळी बु.पंचायत समिती मधून निकिता मुजमूले (राष्ट्रवादी), डिघोळ ई.पंचायत समिती मधून गंगाबाई शिंदे (राष्ट्रवादी) हे उमेदवार विजयी झाले आहेत.

# गंगाखेडाला १४ फेब्रुवारी रोजी शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा : कायदेविषयक महाशिबीराचेही आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती ,गंगाखेड तसेच जिल्हा प्रशासन यांच्यावतीने दि. १४ फेब्रुवारी, रोजी सकाळी ११ वाजता कापसे मंगल कार्यालय परळी रोड, गंगाखेड येथे विधी सेवा महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या महावेळाव्याचा मुख्य विषय ज्येष्ठ नागरिकंसाठीच्या योजना व वैद्यकीय तपासणी असून त्या व्यतिरिक्त समाजातील दुर्बल, वंचित घटकांना शासकीय कार्यालयातील विविध लोककल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करणे तसेच त्याचा लाभ मिळविण्यासाठी कायदेविषयक जनजागृती करणे हा शिबिराचा उद्देश आहे. जिल्ह्यातील विविध शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत त्यांच्या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या सेवा व योजनांबाबतही माहिती व लाभ देण्याकरीता महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे आणि न्यायमुर्ती संजय ए. देशमुख, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद तथा पालक न्यायाधीश, परभणी जिल्हा यांच्या हस्ते महाशिबीराचा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनानुसार हा कार्यक्रम पूर्ण होणार आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नितीशा माथुर याच्या उपस्थितीमध्ये हे महाशिबीर होणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी महाशिबीराला उपस्थित राहून शासकीय योजनांबाबत माहिती करुन घ्यावी व शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भुषण काळे आणि गंगाखेड वकील संघाचे अध्यक्ष मिलिंद क्षिरसागर यांनी केले आहे.

# के. के. एम. महाविद्यालयाला करिअर कट्ट्याचे तीन जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर

**मानवत,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत के. के. एम. महाविद्यालयाला तीन जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कौशल्यांना वाव देण्यासाठी करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

करिअर कट्ट्यांतर्गत एमपी यांनी यावेळी वर्चस्व मिळविले आहे.

# बोरीच्या नेमिनाथ जैन यांना राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार प्रदान

**बोरी,/प्रतिनिधी:** शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा जं.आणि परभणी जिल्हा ग्रंथालय संघ परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने ४८ वे परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशनात बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना ग्रंथालय क्षेत्रातील समर्पित योगदानाबद्दल स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिकुलपती डॉ. अशोक महाजन, छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, कार्यक्रमाचे संयोजक तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, गुलाबराव कदम डॉ. धर्मराज वीर, सुनील वायाळ, एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबईचे डॉ. सुभाष चव्हाण, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुण्याचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख डॉ . राजेंद्र कुंभार, व. ग. सूर्यवंशी , मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, राजेंद्र हंबीरे, डॉ, राजेंद्र सानप, ज्ञानेश्वर पाटील ,डॉ. मधुकर गरड, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे कार्यवाहक राम मेकले, प्रा. चंद्रकांत जोशी सनपूरकर, प्रा. विलास वैद्य आदींची यावेळी उपस्थिती होती. प्रतिकुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रंथालय क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नेमिनाथ जैन यांना राज्यस्तरीय ग्रंथ मित्र पुरस्कार दिला असल्याचे संयोजक प्राध्यापक डॉ. रामेश्वर पवार यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास जिल्ह्यातील ग्रंथालयाचे पदाधिकारी ग्रंथपाल व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नेमिनाथ जैन यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### नांदेड परिक्षेत्रात उदगीर व नांदेड येथील जुगार अड्ड्यांवर छापे; ८.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी:** नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यातील उदगीर व नांदेड शहरातील इतवारा भागात अवैध जुगार अड्ड्यांविरुद्ध विशेष कारवाई करण्यात आली.

या कारवाईसाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्यासह पाच अंमलदारांचे पथक तैनात करण्यात आले होते. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाईक चौक येथे रमेश गिरी याच्या जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ लाख ५ हजार २०० रुपये रोख व ७० हजार रुपये किमतीचे १२ मोबाईल असा एकूण १ लाख ७५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी १३ आरोपींना ताब्यात घेऊन उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ४१/२०२६ कलम ४ व ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर दि. ३० जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरातील इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मच्छी मार्केट परिसरात जुगार अड्ड्यावर कारवाई करण्यात आली. यामध्ये जुगार खेळणाऱ्या २५ व्यक्तींकडून २ लाख ३४ हजार १०० रुपये रोख व ४ लाख २८ हजार रुपये किमतीचे २७ मोबाईल असा एकूण ६ लाख ६२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ३२/२०२६ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, याच कारवाईदरम्यान जयकिशन ऊर्फ जय राजेशसिंह ठाकूर (वय २१, रा. उल्हासनगर, तरोडा नाका) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल व तीन जिवंत काडतुसे असा ३१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा र. नं. ३१/२०२६ कलम ३/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ४० हजार रुपये रोख, ५ लाख रुपये किमतीचे ३९ मोबाईल, जुगार साहित्य तसेच एक गावठी अग्निशस्त्र व तीन जिवंत काडतुसे असा एकूण ८ लाख ६८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्यासह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पो.कॉ. गणेश धुमाळ, पो.कॉ. कामाजी गवळी व पो.कॉ. विलास सुरवसे यांनी सहभाग घेतला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना १० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. सदर अवैध व्यवसायामागे आणखी कोणाचे पाठबळ आहे का, याचा तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले.

### झिरो फाटा येथील लूट व मारहाण प्रकरणातील आरोपी मुद्देमालासह ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा पोलिस ठाणे हद्दीतील झिरो फाटा परिसरात हत्यार दाखवून पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत फिर्यादीस मारहाण केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील आरोपींना पूर्णा पोलिस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करत २४ तासांच्या आत मुद्देमालासह आरोपीस शनिवारी(दि. ३१) ताब्यात घेतले.

मंगळवारी झिरो फाटा परिसरात आरोपीने हत्याराच्या जोरावर प्रवाशांकडून नगद पैसे, दागिने आणि मोटरसायकल काढून घेत मारहाण केली होती. या प्रकरणी पूर्णा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाची पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी गंभीर दखल घेऊन स्थानिक गुन्हे शाखा आणि पूर्णा पोलिसांतील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून आरोपींचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेश दिले होते. यावरून अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान, गुन्ह्यातील आरोपी हे किनगाव येथे असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाल्यावरून पथकाने तात्काळ कारवाई करत संतोष वामनराव शिंदे (वय ४४)रा.भीमनगर किनगाव आणि शुभम सुनिल उपाडे(वय १९) रा. पंचशीलनगर किनगाव या आरोपींना शिताफिने ताब्यात घेतले. आरोपींच्या चौकशी दरम्यान झिरो फाटा परिसरातील गुन्हा त्याच्या इतर सहा साथीदारांच्या मदतीने केल्याचे कबुली दिली. गुन्ह्यात वापरलेला आणि मिळविलेल्या मुद्देमालाबाबत कबुली दिल्याने आरोपींच्या ताब्यातून एक बुलेट मोटरसायकल, एक चांदीचे ब्रेसलेट आणि एक सोन्याची अंगठी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात आणि अपर पोलिस अधिक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील, पुर्णा पोलिसांचे पोलिस निरीक्षक विलास गोबाडे, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार, पडलवार, पोलिस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, रंगनाथ दुधाटे, सचिन भदर्गे, उत्तम हनवते, गजानन क्षीरसागर, सुधीर काळे, श्याम काळे, ताजुद्दीन, मोहित पठाण आणि गणेश कौटकर यांनी मिळून केली.

### महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी १२ फेब्रुवारीला सभा

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवार ३० जानेवारी ते सोमवार २ फेब्रुवारी दरम्यान सकाळी १० ते दुपारी ५.४५ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

### त्या अपघात प्रकरणी गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी नगर महामार्गावरील गणेशपूर - देवगाव फाटा नजीक दोन कारचा भिषण अपघात झाला या अपघातात परभणी येथील दोघेजण ठार झाले होते. तर इतर तिन जण गंभीर रित्या जखमी झाल्याची घटना मंगळवार दि २ मध्यरात्री एकच्या सुमारास घडली होती. परभणी येथील अस्ट्रो कार क्रंमाक एमएच २२ ए डब्लु ५११५ या कार मधील चौघे जण छत्रपती संभाजी नगर येथे लग्नपत्रीका वाटण्यासाठी गेले होते. काम अटोपून परभणी कडे येत असताना ब्रिझा कार क्रमाक एमएच १४ एफ.एस ०८९७ हि जिंतूर येथून मंठा येथे जात होती. दरम्यान या दोन्ही वाहनाचा गणेशपूर - देवगाव फाटा जवळ समोरा - समोर भिषण अपघात झाला होता. अपघातात परभणी येथील ज्येष्ठ पत्रकार नितीन कुमार धूत वय ६५ वर्ष रा. परभणी हे जागीच ठार झाले तर जिंतूर साहयक निंबधक संजय आब्दगिरे यांचा उपचारा दरम्यान मुत्यु झाला. तर जखमी मध्ये ॲड मनोज तोष्णीवाल वय ५५ वर्ष रा. परभणी, विजय ताडकळसकर वय ६५ रा. परभणी तर ब्रिझा कार मधील एक जण जखमी झाला दरम्यान दि ३ रोजी अपघातील जखमी विजय ताडकळसकर रा. परभणी याच्या फिर्यादीवरून कार क्रमाक एमएच १४ एफ.एस ०८९७ चा चालक (नाव माहित नाही) याच्या विरूध्द चारठाणा पोलीस ठाण्यात कलम १०६,( १ ) २८१ , १२५,( ए ) १२५ ( बि) बिएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनी मुंजाजी दळवे हे तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अखेर कोंडी फुटली...

सध्या डोनाल्ड ट्रम्प यांचे वागणे म्हणजे धनाढ्य घरातील उनाड मुलासारखे आहे. ज्याप्रमाणे साऱ्या वस्तीला, गावाला अशा उनाड मुलाचा त्रास मुकाट्याने सहन करावा लागत असतो, तीच परिस्थिती सध्या जगाची ट्रम्प यांच्या बाबतीत झाली आहे. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अवघे जग घायकुतीला आले आहे. एवढेच नव्हे तर, खुद्द अमेरिकेतही प्रचंड खदखद आहे. कित्येकवेळा लक्षावधी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरले आणि ट्रम्प प्रशासनाचा निषेध केला. पण, 'अमेरिका फर्स्ट' चा नारा देत आपलेच घोडे पुढे दामटणाऱ्या ट्रम्प यांना कुणाचेही सोयरसूतक राहिलेले नाही. त्यांच्यासाठी आता नैतिक-अनैतिक यांच्यातील फरक उरलेलाच नाही. ट्रम्प यांच्या व्यापारविषयक धोरणांमुळे जगातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली. अनेक देशांवर जबर व्यापार शुल्क लादल्याने अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाले. जे युरोपीयन देश जागतिक राजकारणात अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून चालत आले आहेत, त्यांनाही ट्रम्प यांनी सोडले नाही. भारतालाही त्याचा चांगलाच फटका बसला. ५० टक्के व्यापार शुल्क आकारल्याने उद्योजकांची वाट कठीण झाली. समुद्री उत्पादने, कापड उद्योग, मोती व दागिने आणि चामडे उद्योगांना तोटा सहन करावा लागला. कारण, या उद्योगातील उत्पादनांची अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. अमेरिकेने आकारलेल्या जशास तसे (रेसिप्रोकल टॅरिफ) शुल्काचा विपरित परिणाम होऊन नोकर कपातीची वेळ अनेक लघुउद्योगांवर आली. पण, भारत सरकारने हे प्रकरण संयमाने हाताळत अमेरिकेमुळे होणारी व्यापार तुट भरून काढण्यासाठी तिसऱ्या जगातील देशांकडे आपला मोर्चा वळविला. चीनप्रमाणे भारताने अमेरिकेसोबत व्यापार शुल्क युद्धात न पडता 'वेट अण्ड वॉच'ची भूमिका घेतली. याच दरम्यान ब्रिटन, न्यूझीलंड, ओमान या देशांबरोबर आणि युरोपीयन युनियनसोबत मुक्त व्यापार करार करीत भारताने अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. भारताने घाईगडबडीत निर्णय न घेता आफ्रिका, युरोप आणि लॅटिन अमेरिकेतील देशांकडे आपला मोर्चा वळविला. भारत बधत नसल्याचे आणि कुठलीही प्रतिक्रिया देत नसल्याचे पाहून ट्रम्प प्रशासन अस्वस्थ झाले. जवळपास सहा महिने ५० टक्के व्यापार शुल्काचा भार सहन करीत भारताने ट्रम्प यांना चर्चेच्या टेबलावर येण्यास भाग पाडले. सध्याचे जग हे एकमेकांशी जुळलेले आहे. प्रत्येक देश इतर देशांवर कशासाठी तरी अवलंबून असतो. अमेरिका स्वतःला कितीही बलाढ्य आणि शक्तिशाली समजत असला तरी त्यालाही चीन, रशियासोबत व्यापार करावाच लागतो. डोकलाम, गलवानच्या घटना होऊनही भारत-चीन यांना जवळ यावेच लागले. कारण, कोणताही देश कायमस्वरूपी एकटा राहू शकत नाही. दीर्घ द्वेष बाळगू शकत नाही. सध्याच्या बहुध्रुवीय जगात शत्रुत्व हे कधीच कायम जपायचे नसते. जगाच्या विकासासाठी संवाद व शांततेची नितांत गरज असते. भारताला डिवचण्यासाठी ट्रम्प गेली सहा महिने विविध प्रकारची विधाने करीत आले. प्रसंगी पाकिस्तानलाही कुरवाळले, आर्थिक मदतही केली, पण भारताने त्यावर कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. दुसरीकडे भारत-अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी चर्चा करीतच होते. अखेर ऑगस्ट २०२५ पासून सुरू असलेली व्यापार कोंडी फुटली आणि दोन्ही देश मुक्त व्यापार करारावर सहमत झाले. ५० टक्के असलेले व्यापार शुल्क १८ टक्क्यांवर आले. आता या करारावर देशभरात चर्चा रंगली आहे. मोदी सरकार ट्रम्प यांच्यासमोर झुकल्याचा आरोप विरोधकांनी सुरू केला आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गदारोळही झाला. करारातील मुद्यांवर दोन्ही बाजूंनी काहीशी संदिग्धता असला, तरी प्रथमता व्यापार कोंडी फोडणे आवश्यक आहे. कारण, देशाच्या प्रमुखाचे काम हे जनतेला त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे असते.

अमेरिका हा कोडगा, स्वार्थी आणि मतलबी देश आहे. तेवढाच पळपुटा आणि घाबरटही आहे. इतिहासात डोकावले असता या देशाने कधीही स्वबळावर एकही युद्ध जिंकले नाही. रशिया अथवा चीनसोबत कधीही तो थेट भिडला नाही. उलट, व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानातून पाठ दाखवून पळून जाण्याची नामुष्की अमेरिकेवर आली. स्वतःला शक्तिशाली समजणारी अमेरिका केवळ अफगाणिस्तान, इराक, सीरिया, व्हेनेझुएला यासारख्या गरीब आणि दुर्बल देशांविरोधात दंड थोपटत असते. भारताविरोधातही कुरापती करीत असते. तरीही तो देश एक महाशक्ती आहे हे नाकारता येत नाही. व्यापार शुल्काच्या माध्यमातून दोन्ही देशांमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेला तणाव निवळण्यास सुरुवात झाली हे चांगलेच झाले. अर्थात्, भारताने संयमी भूमिका घेत राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडविल्याने हे शक्य झाले. काहीही असले तरी, अमेरिका आजही जगातील आर्थिक आणि लष्करी महाशक्ती आहे, हे मान्य करावे लागेल. दोन दिवसांपूर्वी शनिवारी व्यापार आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी दिल्लीत पत्रपरिषद घेऊन व्यापार करारातील मुद्यांची माहिती दिली. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्के खाली आणल्याने नाही म्हटले तरी भारताला बराच दिलासा मिळणार आहे. आज भारतीय अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डालर्स तर अमेरिकेची तब्बल ३० ट्रिलियन डालर्स एवढी महाकाय आहे. या करारामुळे भारतीय उत्पादकांना अमेरिकेची विशाल बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. भारताची १४० कोटींची विशाल लोकसंख्या ही आज आपली जमेची बाजू ठरत आहे आणि एवढ्या विशाल ग्राहकांच्या बाजारपेठेवर अमेरिकेची नजर असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे दोन्ही देशातील व्यापाऱ्याना परस्पर फायदा करून देणारा हा व्यापार करार आहे. तथापि, भारताने अमेरिकेला रान मोकळे करून दिले, असे मुळीच नाही. खुद्द व्यापार मंत्री गोयल यांनी कृषी आणि दुग्ध क्षेत्रात अमेरिकेला शिरकाव करू दिला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ग्रामीण भारत हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशावर कितीही संकटे आली तरी आपला शेतकरी आणि छोटा व्यापारी वर्ग संकटकाळात भारतीयांचे पोट भरीत असतो. या करारात मका शेती, कुक्कुटपालन, भाजीपाला, इथेनॉल उत्पादन, तंबाखू क्षेत्रांना संरक्षण देण्यात आले आहे. सोबतच धान्य उत्पादन बाजारातही अमेरिकेचा प्रवेश होणार नाही. ज्वारी, गहू, बाजरी, तांदुळ, मका, राजगीरा, नाचणी या धान्यांना करारात पूर्णपणे संरक्षण देण्यात आले आहे. म्हणजेच कृषी क्षेत्र खुले केल्याचे जे आरोप विरोधक करीत आहेत, त्यात तथ्य नाही. व्यापार करताना आपले नुकसान व्हावे, असे कुणालाही वाटत नसते. काही क्षेत्रांत भारतीय उत्पादनांवर अमेरिका १८ टक्के व्यापार शुल्क आकारणार आहे. त्यात वस्त्रोद्योग, प्लॅस्टिक, रबर, गृहसजावटीच्या वस्तू, हस्तोद्योगाची उत्पादने आणि निवडक यंत्रांचा समावेश आहे. या व्यापार करारामुळे निर्यातीत वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. अशा व्यापारात दोन्ही देशांचा काही फायदा तर काही नुकसान असतेच. पण, व्यापाराची कोंडी फुटली, हे महत्त्वाचे आहे. येत्या पाच वर्षांमध्ये भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डालर्सची उत्पादने आयात करणार आहे. यात ऊर्जा उत्पादने, विमाने, मौल्यवान धातू, तंत्रज्ञान उत्पादने आणि कोकम कोलचा समावेश आहे. ऑटो सेक्टरसाठी या करारामुळे दिलासा मिळणार आहे. कारण, भारत दरवर्षी अमेरिकेला ६.५ अब्ज अरब डालर्सचे ऑटो कंपोनंटस् निर्यात करीत असतो. सुखावणारी बाब म्हणजे, भारतीय शेतकरी आणि मासेमारांसाठी अमेरिकेची विशाल बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. भारताला विमानांच्या सुट्या भागांवर कलम २३२ अंतर्गत सवलत मिळेल. विशेष म्हणजे, करारातील कलमे अंतिम नाहीत.

एका देशाने करारातील शुल्कात बदल केल्यास दुसऱ्या देशालाही शुल्कात बदल करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे दोन्ही देशांना व्यापार विकासाची समान संधी मिळणार आहे. शेवटी कोंडी फुटणे आवश्यक असते. ते झाले हे छानच. भारताकडे वाट पाहण्याचा संयम आणि चर्चेला भाग पाडण्यासाठी आवश्यक ती ताकद आहे हेही जगाला दिसले हे अधिक छान झाले! ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# तणाव निवळला!

वर्षभरापासून भारत-अमेरिका संबंधात आलेला तणाव अखेर निवळत असल्याचे संकेत आहेत. दोन्ही देशांत व्यापार कराराचा मसुदा तयार झाल्यानंतर हा तणाव कमी होण्याची प्रक्रिया सुरू झाली. भारत आता रशियाकडून कमी तेल आयात करील व त्याबदल्यात अमेरिकेकडून जादा ऊर्जा संसाधनांची आयात केली जाईल असे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केल्यानंतर तणाव कमी झाल्याचे चित्र तयार होत आहे. मात्र हा दावा राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला आहे. भारत सरकारने याबाबत काहीही म्हटलेले नाही. किंबहुना रशियातून तेल आयात केले जाईल असेच संकेत सरकारमधून दिले जात आहेत.

**शीतयुद्धाची स्थिती :** भारत-अमेरिका यांच्यात मागील काही महिन्यांपासून एक प्रकारच्या शीतयुद्धाची स्थिती तयार झाली होती. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प दररोज भारताविरोधात नवनव्या निर्णयांची घोषणा करीत होते. भारताकडून आयात होणाऱ्या वस्तूंवर त्यांनी भरमसाट आयात शुल्क लावले होते. याचा विपरीत परिणाम भारतीय उद्योजकांवर होत होता. दुसरीकडे मात्र याने चीनची चंगळ होत होती. याकाळात भारत-चीन व्यापार सातत्याने वाढत होता. या सर्व बाबी भारताच्या हिताच्या नव्हत्या. मात्र, आता हा तणाव कमी होत असल्याचे दोन्ही देशांनी जाहीर केले आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती व भारताचे पंतप्रधान यांनी समाज माध्यमांवर याची घोषणा केली आहे. या करारानुसार भारतातून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या निर्यातीवरील शुल्क २५ टक्क्यांवरून घटवून १८ टक्के करण्यात आले आहे. मात्र याबदल्यात भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी न करण्याचे आश्वासन दिले असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. भारत आता अमेरिकेकडून कच्चे तेल आयात करणार आहे, असेही ट्रम्प यांनी घोषित केले आहे.

**मुद्दा तेलाचा :** भारत रशियाकडून आयात करीत असलेले कच्चे तेल हा दोन्ही देशांत सुरू झालेल्या शीतयुद्धाचा मुख्य मुद्दा ठरला होता. भारताने ही आयात थांबवावी अशी मागणी ट्रम्प करीत होते तर भारत त्यास फारसा प्रतिसाद देत नव्हता. मात्र, मागील काही महिन्यात अमेरिकेने आर्थिक व्यवहार करणाऱ्या काही संस्थांवर कडक आर्थिक निर्बंध लावल्यानंतर रशियन तेलाची आयात करणाऱ्या भारतीय कंपन्यांना रशियन कंपन्यांशी व्यवहार करणे जवळपास अशक्य झाले होते. यानंतर मग रिलायन्सने एक प्रसिद्धिपत्रक जारी करीत, आमच्याकडे रशियन तेलाची आयात होत नसल्याचे व नजीकच्या काळात ती होण्याची शक्यताही नसल्याचे घोषित केले होते. भारताने रशियाकडून तेल आयातीत घट केल्याचा हा पहिला मोठा संकेत होता. याने राष्ट्रपती ट्रम्प सुखावले होते. आता दोन्ही देशांनी एकप्रकारे त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. भारत रशियाकडून कमी तेल आयात करील तर याउलट अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर तेलाची आयात केली जाईल असे दिसते. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या तेलाच्या विहिरी बळकावल्या आहेत. त्यातून तेल बाहेर काढण्यासाठी अमेरिकन कंपन्या त्या देशाकडे रवाना झाल्या आहेत. आता या तेलाचे काय करावयाचे असा प्रश्न अमेरिकेसमोर होताच. हे तेल आता भारतात येणार आहे.

**तेल हा तर बहाणा :** भारत-अमेरिका संबंधात रशियाकडून आयात केले जाणारे तेल हा एक बहाणा असल्याचे मानले जाते. दोन्ही देशांत कटुता येण्याची खरी कारणे वेगळीच आहेत. मे महिन्यात भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या संघर्षात आपण मध्यस्थी केली. तो संघर्ष मिटविला. पण, भारत सरकार ते मान्य करावयास तयार नाही. उलट याचा इन्कार करून आपल्याला अपमानित करीत आहे, असे राष्ट्रपती ट्रम्प यांना वाटत होते. ट्रम्प यांनी अद्याप आपल्या मध्यस्थीचा दावा सोडलेला नाही. दुसरीकडे पाकिस्तानने मात्र आपल्याला योग्य तो सन्मान दिला अशी त्यांची भावना आहे.

२०२४ च्या २० जानेवारी रोजी ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ सुरू झाला. तेव्हापासूनच दोन्ही देशांच्या संबंधात कटुता येणे सुरू झाले. काही जाणकारांच्या मते ट्रम्प राष्ट्रपती नसताना त्यांच्याबाबत भारताकडून घडलेल्या काही घटना त्यांना फार टोचल्या. त्यात ऑपरेशन सिंदूरची भर पडली. मग, त्यात रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या तेलाने जणू तेल ओतले. याने भारत-अमेरिका संबंधात आग भडकली. मात्र, आता या आगीवर पाणी टाकून ती शांत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मधल्या काळात ट्रम्प प्रशासनाने घेतलेले काही भारतविरोधी निर्णय मागे घेतले जातील असे समजते.

ट्रम्प प्रशासनाने भारतीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत घेतलेले काही निर्णयही लवकरच मागे घेतले जातील असे संकेत आहेत. भारताने रशियाकडून आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलात कपात केल्याने ट्रम्प सुखावले आहेत. त्यांच्या दुखावलेल्या अहंकारावर या निर्णयाने एकप्रकारे मलमपट्टी झाली आहे.

**पाकला धक्का :** भारत-अमेरिका संबंध पूर्ववत् होण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला असल्याचे समजते. अमेरिकेने पाकिस्तानला अतिशय भेदक मारक क्षमता असलेली काही प्रक्षेपणास्त्रे विकण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका त्यावर फेरविचार तर करणार नाही हा प्रश्न पाकिस्तानी नेतृत्वाला भेडसावीत आहे. मात्र, मुस्लिम जगतात सक्रिय राहण्यासाठी अमेरिकेला आपली गरज आहे याची पाकिस्तानला जाणीव आहे. शिवाय अमेरिकेशी मधुर संबंध असणारे कतार, कुवैत व सौदी अरेबियासारखे देश आपल्या मदतीसाठी धावून येतील याची पाकिस्तानला खात्री आहे. आणि पाकिस्तानचे हे आकलन एकदमच चुकीचे आहे असे मानता येणार नाही. अमेरिका पाकिस्तानला एकदम 'तलाक' देणार नाही. तो फक्त भारताशी आपले संबंध सुधारण्याचा प्रयत्न करील असे काही निरीक्षकांचे मत आहे.

**चीनचे मौन :** चीनने मधल्या काळात एक निवेदन जारी करीत अमेरिका हा भारत-चीन सहकार्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप लावला होता. तो या साऱ्या घटनाक्रमाकडे शांतपणे पाहत आहे. भारत-अमेरिका संबंध पूर्ववत् झाल्यास ते चीनला आवडणारे नाही. अमेरिका किती प्रमाणात भारताशी आपले संबंध सुधारेल याकडे चीनचे लक्ष राहणार आहे.

**रशियाचेही मौन :** भारताने आपल्याकडून तेल आयातील केलेली घट रशियाला रुचलेली नाही. मात्र, एक परिपक्व देश म्हणून रशियाने यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. भारताने आपल्या या भूमिकेची रशियाला कल्पना दिली असावी असा अंदाज वर्तविला जात आहे. भारताला तेल विकून त्याबदल्यात मिळणारा पैसा युक्रेन युद्धात वापरला जात होता. त्यामुळे याचा परिणाम युक्रेन युद्धावर कितपत होईल याची चर्चा केली जात आहे. येणाऱ्या काळात चीन-रशिया आणखी किती जवळ येतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

भारत रशियाकडून तेलाची आयात घटविणार की पूर्णपणे बंद करणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र या करारात आणखी काही बाबी स्पष्ट झालेल्या नाहीत. त्यासाठी काही काळ जावा लागेल असे सरकारी गोटातून सांगितले जाते. मधल्या काळात भारत आणि रशियात आणखी काही महत्त्वाचे करार झाले आहेत. ट्रम्प त्याबाबत काय भूमिका घेतात याकडेही आंतरराष्ट्रीय जगताचे व भारताचे लक्ष राहणार आहे. जगाचे सत्तासंतुलन स्थिर राहण्यासाठी जगातील दोन मोठ्या लोकशाही देशांमध्ये सलोखा व सहकार्य असावे हे दोन्ही देशांच्या हिताचे होते. दोन्ही देशांनी तो मार्ग निवडला आहे ही निश्चितच एक समाधानाची बाब मानली जाईल. ▮

## वेध

पुंडलिक आंबटकर

# संक्रमण काळ आणि ऋतुधर्म

सध्या संक्रमणाचा काळ सुरू आहे. वाऱ्याची दिशा बदलल्याने वातावरणात उष्मा जाणवू लागला आहे. वसंत ऋतूचे आकर्षण तसे सर्वांनाच असते. परंतु, तत्पूर्वी पानगळ येऊन गेल्याने झाडे उघडी बोडकी होऊन जातात. सध्या आमराई बहरून आल्याने वातावरणात मंद मंद सुगंध दरवळत आहे. मकर संक्रांतीपासून संक्रमणाला सुरुवात होते आणि दिवसाचा प्रहर तिळ-तिळ वाढू लागतो. हिवाळ्याच्या काळात रात्री मोठ्या आणि दिवस लहान असतात. परंतु, मकर संक्रातीपासून दिवस हळूहळू वाढू लागतो आणि उन्हाळ्यात ही वाढ आपल्या अंतिम चरणावर पोहोचते. महाशिवरात्रीपासून कोरडे वारे वाहू लागतात आणि मग तापमानात वाढ झाल्याने रात्री सौम्य गारवा जाणवतो, तर दिवसा कडक उन्हाचा अनुभव येतो. पळस पांगारा फुलल्यानंतर होळी व धूळवड साजरी करून या सोहळ्याची विधीवत सांगता होते आणि कडक उन्हाळा सुरू होतो.

सूर्याने धनू राशीतून मकर राशीत प्रवेश केल्याने संक्रमण सुरू झाले आहे. सूर्याभोवती प्रदक्षिणा घालताना पृथ्वीच्या अक्षाचा कल सारखा राहत असला, तरी यामुळे एक गोलार्ध सूर्यासमोर ६ महिने आणि दुसरा ६ महिने सूर्याच्या मागे राहतो. परिणामी, पृथ्वीवरील सूर्यकिरणांचा कोन बदलतो आणि सूर्य ६ महिने उत्तरेकडे आणि ६ महिने दक्षिणेकडे फिरल्याचा आभास देतो. यालाच भौगोलिक भाषेत उत्तरायण आणि दक्षिणायन म्हणतात.

उत्तर गोलार्धात १४-१५ जानेवारीपासून सूर्यास्ताची वेळ हळूहळू पुढे सरकते. त्यानंतर २१ मार्च ही तारीख येते. यावेळी दिवस आणि रात्र अगदी समान असते. या स्थितीला शास्त्रीय भाषेत इक्विनॉक्स असे म्हणतात. सामान्यतः भारतातील बहुतांश सण चंद्राच्या भ्रमणावर विसंबून असतात. त्यामुळेच या सणांच्या तारखा दरवर्षी बदलतात. परिणामी, होळी आणि दिवाळीसारखे सण दरवर्षी वेगवेगळ्या तारखांना येतात. परंतु, मकर संक्रांत हा एकमेव सण आहे जो सूर्याच्या चक्रावर अवलंबून असतो. इंग्रजी दिनदर्शिकादेखील सूर्याच्या याच गतीवर काम करते. त्यामुळेच मकर संक्रांत दरवर्षी १४ किंवा १५ जानेवारीला येते.

भारतात पानगळ प्रामुख्याने शिशिर ऋतूत म्हणजेच हिवाळ्याच्या शेवटी आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीला सुरू होते. याच काळात जमिनीतील ओलावा कमी झाल्याने झाडाझुडपांना वाळवी लागते. परंतु, यंदा जानेवारी महिन्यातच झाडांना वाळवी लागल्याने ऋतुधर्मात बदल झाल्याचे स्पष्ट जाणवत आहे. सुकलेल्या मातीचे आच्छादन तयार करून वाळवी झाडात शिरते. यामुळे झाड कमकुवत व मलूल होते अथवा मरून पडते. यंदा वाळवीसाठी पोषक वातावरण लवकरच तयार झाल्याने ही निसर्गाच्या दृष्टीने एकप्रकारे धोक्याची घंटा आहे. यंदा पाऊस अधिक पडूनही जमिनीतील ओलावा झपट्याने कमी होत चालला आहे. रानातील पाणवठे सुकत आहे. अर्थातच जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी झालेली आहे. याच कारणामुळे वन्यप्राणी उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच शेतशिवारांमध्ये दाखल झाल्याच्या बातम्या वाचायला मिळतात.

सध्या पानगळ सुरू झालेली आहे. काही मोठ्या झाडांची पाने गळून खाली पडत आहे. पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यासाठी आणि कोरड्या हवामानात तग धरण्यासाठी विधात्याने वनराईला बहाल केलेले हे सर्वांत मोठे वरदान होय. अद्याप पानगळ भरात आलेली नाही. मात्र, रानावनात आम्रवृक्ष बहरून आल्याने संपूर्ण वातावरण भारावून गेले आहे. गल्लोगल्ली व खेड्यापाड्यांसह शहरांमधील वातावरणातही आम्रफुलांचा दरवळ उठला आहे. पानगळ जेव्हा आपल्या अंतिम चरणावर पोहोचते तेव्हा मोठमोठ्या वृक्षांच्या खाली पाचोळ्याचे ढीग लागतात. वनराई उघडी बोडकी झाल्याने संपूर्ण रान पारदर्शक झाल्याचा भास होतो. अशातच पळसाच्या अंगाखांद्यावर अग्निफुले डोकावू लागतात आणि मग संपूर्ण रान लालजर्द फुलांनी डवरून येते. रस्त्यांच्या दुतर्फा फुललेला पळस मनाला भुरळ घातल्यावाचून राहात नाही.

होळी सण जवळ आला आहे. हिंदूंच्या इतर सणांसह होळी सणामागेही वैज्ञानिक कारण आहे. हिवाळा संपून उन्हाळा सुरू होताना हवेतील आर्द्रता बदलते. त्यामुळे वातावरणात रोगराई पसरते. या रोगराईवर मात करण्यासाठी होळी पेटविली जाते. या सणामागे धार्मिक मान्यता असल्या तरी वैज्ञानिक कारण मूळ आहे. गोवरी पेटविल्याने वातावरणातील जंतुसंसर्ग नष्ट होतो, हे सिद्ध झाले आहे. त्यामुळेच पूर्वी होळीला शेणापासून तयार केलेल्या चाकोल्यांच्या माळा अर्पण केल्या जायच्या. अलिकडे मात्र शेणाचा वापरच कमी झाला आहे. एकूणच प्राचीन धर्मवेत्त्यांनी सण-उत्सव साजरे करण्यामागे जे मापदंड घालून दिले आहे; त्याचा वापर आधुनिक काळातही होणे जीवसृष्टीच्या कल्याणासाठी नितांत गरजेचे आहे. ▮

९८८१७१६०२७

## कानोसा


अमोल पुसदकर

# समर्थ रामदास स्वामींचा पत्रसंदेश

ज्या वेळेस भारतामध्ये टपाल खाते अस्तित्वात नव्हते, त्याही वेळेस पत्रव्यवहार अस्तित्वात होता. रामायण, महाभारत काळामध्ये सुद्धा पत्रव्यवहार चालायचा. त्यामध्ये राजकीय पत्रे, कौटुंबिक पत्रे अशी वेगवेगळ्या पद्धतीची पत्रे असायची. समर्थ रामदासांच्या काळातही मोठ्या प्रमाणावर पत्रव्यवहार चालायचा. स्वतः समर्थ रामदास स्वामींनी छत्रपती शिवाजी महाराजांना काही पत्रे पाठविली होती, तसेच संभाजी महाराजांना सुद्धा पाठविली होती. काही पत्रे त्यांनी त्यांच्या शिष्यांना पाठविलेली आहेत, तर काही पत्रे त्यांनी त्यांच्या भावाला, भावाच्या मुलाला सुद्धा पाठवलेली आहेत. त्यांनी ही पत्रे ज्यांना पाठविली, त्या मागची त्यांची भूमिका आणि ज्यांना ती पाठविली गेलेली होती, त्यांची भूमिका, या दोन्ही भूमिकेतून जर आपण पत्रांना वाचले, तर आपल्याला त्यातून खूप मोठा अर्थ, नवे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

काही दिवसांपूर्वी एका श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनावर पुस्तक लिहिण्याचा संकल्प काही लोकांनी केला. त्यांनी त्यांच्या सामाजिक जीवनाच्या चाळीस वर्षांच्या कालावधीमध्ये कमीत कमी ४००० पत्रे लिहिली असतील. परंतु ज्या वेळेला वेगवेगळ्या लोकांना शोधून ती जमविण्याचा प्रयत्न केला त्यावेळेला त्यातील फक्त तीन-चार पत्रे हाती लागली. समर्थ रामदासांनी सुद्धा शेकडो पत्रे लिहिली असतील, परंतु त्यापैकी केवळ १९ पत्रे आज उपलब्ध आहेत.

समर्थ रामदास स्वामी हे १६४५ ते १६४९ या चार वर्षांच्या कालावधीत शहाजीराजांची जहागिरी असलेल्या चाफळच्या खोऱ्यात होते. या काळामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी छोटे मोठे किल्ले जिंकून आपल्या कार्याचा शुभारंभ केलेला होता. त्यांनी जनतेमध्ये आपले राज्य म्हणजे स्वराज्य असावे, अशा पद्धतीची भावना जागृत करायला सुरुवात केलेली होती. त्यांच्या या आवाहनाला जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत होता. जनता मोगलाईला कंटाळलेली होती. ती आदिलशाही असो, निजामशाही असो की शहाजान असो, या सर्वच हिंदुविरोधी होत्या, अत्याचारी होत्या. परंतु असे असताना सुद्धा मोठ मोठे पराक्रमी हिंदू सरदार हे बादशहाची चाकरी करण्यात धन्यता मानत होते. अशा परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसारखा एक तरुण बादशाही विरोधात शस्त्र उगारतो, स्वराज्याची संकल्पना मांडतो, ही गोष्ट समर्थ रामदास स्वामींना फारच भावलेली होती. त्यामुळे त्यांनी १६४९ मध्ये शिवाजी महाराजांना जे पत्र पाठविले आहे, त्यामध्ये त्यांनी शिवाजी राजांचे वय, यश, स्वराज्य सर्वच लहान असूनही त्यांचा मुक्तकंठाने गौरव केलेला दिसून येतो. ते म्हणतात,



**निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।**
**अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।**

शिवरायांच्या कार्याचा नुकताच शुभारंभ झालेला होता. शहाजीराजांनी सुद्धा अशाच पद्धतीचा एक स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न शिवरायांचा जन्म झाला त्यावेळेस करून पाहिलेला होता, परंतु तो यशस्वी होऊ शकला नव्हता. त्यानंतर ते पुन्हा आदिलशाहीकडे नोकरीकरिता गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला निश्चय हा शेवटपर्यंत अटळ राहिला पाहिजे, यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कदाचित समर्थांनी 'निश्चयाचा महामेरू' असे त्यांना संबोधले असू शकते. त्यांना 'श्रीमंत योगी' या विशेषणांनी सुद्धा समर्थांनी गौरविलेच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जे कार्य आरंभिलेले होते, ते कार्य गोरगरीब जनतेसाठीच होते. त्यामुळे समर्थ म्हणतात,

**परोपकाराचीया राशी । उदंड घडती जयासी ।**
**तयाच्या गुण महत्त्वासी । तुळणा कैची।**

जे शिवराय असे सर्वसामान्य जनतेसाठी झटत आहेत, त्यांच्या गुणांची तुलना काय करावी, असे समर्थ म्हणतात. त्या काळची परिस्थिती कशी होती हे सांगताना समर्थ म्हणतात-

**तीर्थक्षेत्रे ते मोडली । ब्राह्मणे स्थान भ्रष्ट जाली ।**
**सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।**

समर्थांनी सर्वत्र भ्रमण केलेले होते. ठिकठिकाणी मुघलांच्याद्वारे चाललेले जनतेवरील अत्याचार ते पाहत होते. हिंदूंना आपल्या धर्माप्रमाणे वागण्यास मुभा राहिलेली नव्हती. गंगेमध्ये स्नान करण्याचा सुद्धा कर द्यावा लागत होता. अशा परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज उभे राहिले. त्यांच्याबद्दल समर्थ म्हणतात,

**देव धर्म गो ब्राह्मण । करावया संरक्षण ।**
**हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ।**

देव, धर्म, गोमाता, समाजातील सज्जनशक्ती यांचे संरक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष ईश्वराने आपल्या अंत:करणात निवास केलेला असून, त्यानेच आपल्याला हे कार्य हाती घेण्याची प्रेरणा दिलेली आहे.

समर्थ रामदास स्वामी हे ईश्वर साक्षात्कारी संत होते. जर, ते म्हणत आहेत की प्रत्यक्ष ईश्वरानी शिवरायांच्या हृदयामध्ये निवास केलेला असून, त्याच्याच प्रेरणेमुळे हे कार्य सुरू आहे, यावरून आपण त्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. छत्रपती शिवराय सुद्धा नेहमी म्हणायचे, हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे. मी जे कार्य करतो आहे, हे ईश्वरीकार्य आहे, असा भाव जर मनामध्ये निर्माण झाला, तर ते कार्य करीत असताना येणाऱ्या संकटांची अजिबात पर्वा, भीती राहत नाही. कदाचित याचमुळे छत्रपती शिवाजी महाराज हे मोठमोठ्या बादशहांशी टक्कर घेण्यासाठी उद्युक्त होऊ शकले. म्हणूनच महाराजांचा गौरव करताना समर्थ म्हणतात-

**यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतीवंत । जाणता राजा ।**

अशा या जाणत्या राजाला समर्थ म्हणतात-

**धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळीली पाहिजे ।**

कारण समर्थांना माहिती आहे की प्रसंग मोठा बाका आहे. राजांच्या जीवावरचे संकट आहे. घरभेदी शत्रूला जाऊन मिळालेले आहे. अशा परिस्थितीत कार्य करणे हे काही सोपे काम नाही. यश मिळविणे सोपे आहे, परंतु यश टिकविणे कठीण आहे. कीर्ती मिळविणे सोपे आहे, परंतु कीर्ती टिकविणे कठीण आहे. मोठमोठे लोक ज्यामध्ये अपयशी ठरतात, त्यामध्ये राजांना यश मिळावे, यासाठीच हा उपदेश समर्थांनी केलेला आहे.

सरते शेवटी ते म्हणतात-

**तुमचे देसी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।**
**ऋणानुबंधे विस्मरण जाले । काय नेणू ।**

समर्थांना राजांच्या भेटीची उत्कंठा होती. त्यामुळे ते म्हणतात की, आम्ही तुमच्या प्रदेशात राहत होतो, तरीही आपली भेट झाली नाही. यामागे आपली भेट व्हावी हा त्यांचा महाराजांना संदेश होता. त्यामुळेच पुढे ही भेट झाली. परंतु कर्त्या पुरुषाच्या मागे अनेक कामे असतात, तशी राजांच्याही मागे अनेक कामे आहेत, हे समर्थ जाणून होते. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## प्रत्येक घरात हवी आजी-आजोबांची माया

कधीकाळी घराच्या अंगणात आजीची हाक आणि आजोबांचा शांत, समजूतदार आवाज एकत्र निनादायचा. त्या आवाजात माया होती, आपुलकी आणि संपूर्ण कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी ताकद होती. आज मात्र, त्या हाकांचा प्रतिध्वनी फक्त आठवणींतच उरला आहे. आजी-आजोबांचे प्रेम आणि संयुक्त कुटुंबाची संस्कृती काळाच्या ओघात हळूहळू लोप पावत आहे. ही वस्तुस्थिती मन हेलावून टाकणारी आहे.

आजी म्हणजे मायेचा अखंड झरा. तिच्या हातच्या जेवणात प्रेम मिसळलेले असायचे. कपाळावरून फिरवलेला हात आणि काय रे, आज थकलास का? हे दोन शब्द आयुष्यभर पुरेल इतका आधार देऊन जायचे. आजोबा म्हणजे अनुभवांचा ग्रंथ. त्यांच्या बोलण्यातून जीवनाचे धडे मिळायचे. कोणताही उपदेश न करता, फक्त उदाहरणातून चूक झाली तर डोळ्यांत राग नाही तर, काळजी असायची. एकत्र जेवण, एकत्र सण, एकत्र दुःख आणि एकत्र आनंद यामुळे घराला खरे



'घरपण' लाभायचे. आजी-आजोबांच्या सहवासात संस्कार नकळत रुजायचे. त्यांनी नातवंडांना माणूस म्हणून घडवले. मात्र, आज बदलत्या काळात चित्र वेगळे दिसते. आज सर्वांच्या हातात मोबाईल आहे. पण, घरात एकमेकांच्या हातात हात नाहीत. संवादासाठी निर्माण झालेले साधन आज संवादच हिरावून घेत आहे. एकाच छताखाली राहूनही मनामनांमध्ये अंतर वाढत चालले आहे. मोबाईलच्या स्क्रीनवर हसू आहे. पण, समोर बसलेल्या माणसासाठी शब्द नाहीत. आजी-आजोबा समोर बसलेले असतात. पण, डोळे मात्र मोबाईलमध्ये गुंतलेले असतात. आज घर गजबजलेले असते. तरी, नात्यांमध्ये एक अनाम शांतता दाटलेली असते. 'ऑनलाईन' जगात गुंतताना 'ऑफलाईन' नाती अबोल होत चालली आहेत. एकत्र जेवणाच्या टेबलावर चमचे वाजतात. पण, संवादाचा आवाज हरवतो आहे. मोबाईलमध्ये कैद झालेले क्षण वाढत आहेत आणि आजी-आजोबांसोबतच्या आठवणी मात्र कमी होत आहेत. आज अनेक आजी-आजोबा आपले मूल आणि नातवंडांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले दिसतात. त्यांच्या थरथरत्या हातांना आधार हवा असतो. पण, तो हात मोबाईल पकडण्यात व्यस्त असतो. कधीकाळी हास्याने भरलेले घर आज शांततेत बुडालेले दिसते आणि त्या शांततेत दडलेले एकाकीपण त्यांच्या डोळ्यांतून ओघळताना दिसते. संयुक्त कुटुंब ही केवळ राहण्याची व्यवस्था नव्हती तर, ती संस्कारांची शाळा होती. आजी-आजोबांचे प्रेम हे निखळ, अपेक्षारहित आणि आयुष्याला दिशा देणारे असते. अजूनही वेळ गेलेली नाही. एक क्षण थांबूया. मोबाईल बाजूला ठेवूया. आजी-आजोबांच्या जवळ जाऊन बसूया. त्यांच्या आठवणी ऐकूया. त्यांच्या थरथरत्या हातात आपला हात देऊया. कारण, उद्या कदाचित मोबाईलमध्ये साठवलेल्या फोटोशिवाय काहीच उरणार नाही.

**संगीता चव्हाण**/८८३०७७३२४२

## वाचक पत्रे

## पर्यटनस्थळ कचरामुक्त होणे आवश्यक

देव जरी मज कधी भेटला... खरंच देव जर मला खरंच भेटला ना तर मी त्याला म्हणेन की देवा माझ्या भारताला कचऱ्याने जो विळखा घातलाय तो विळखा सुटेल असं काहीतरी कर. कारण मला समजतच नाही की अशी कशी मानसिकता आहे घेतला कचरा की टाक रस्त्यावर? हेच लोक भरपूर पैसे खर्च करून घराचं डेकोरेशन करतात, मग ज्या देशात आपण राहतो, ज्या रस्त्यावरून आपण चालतो त्याबाबत एवढी उदासीनता का? मी आजवर भरपूर प्रवास केलाय. नुकतेच सुप्रसिद्ध बस्तर जिल्ह्यातील चित्रकोट्या धबधबा पाहायला गेलो. अतिशय सुंदर आहे हा धबधबा. सुंदर शंकराचं मंदिर आहे, पण धबधब्यापर्यंत अगणित प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अन्न भरून बेमुर्वतपणे भिरकावलेल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी श्रीसप्तशृंगी देवीला जाण्याचा योग आला. एका सेल्फी पॉईंटवर थांबलो. तिथे पाण्याच्या बाटल्या हवेमुळे इतस्ततः भिरभिरत होत्या. थोड्यावेळात एक दुकानदार आला आणि त्याने दुकानात साठलेला कचरा दरीच्या काठावर टाकला. ट्रेनने प्रवास करताना स्टेशनजवळ आल्याची खूण म्हणजे कचरा दिसायला लागतो. काय उपाय असू शकेल यावर, जेणेकरून भारतातील पर्यटनस्थळे कचरामुक्त होऊन सुंदर दिसतील. मला असं वाटतं की जिथं कुठं पर्यटकांना प्रवेश दिला जातो तिथे चेकपोस्ट असावे, तिथे बघावं किती प्लास्टिक बरोबर नेताहेत. त्यानुसार शुल्क आकारावं आणि परत जाताना जेवढं नेलं होतं तेवढं आणलंय की नाही त्यानुसार पैसे परत करावे. शाळांशाळांतून मुलांना याबाबत धडे देणं आवश्यक आहे. जेणेकरून पुढे काहीतरी सुधारणा दिसू शकेल. भावी पिढी जबाबदार नागरिक म्हणून तयार होतील. ▮

**मेधा सोहोनी**/७७२२०४३९८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सौ.के.एस.के.महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

लेखक कवी लेखन अथवा व्यक्त होताना त्याने सामाजिकतेचे भान ठेवले पाहिजे. विनोद हा आपल्या शैलीतून व्यक्त होताना उपस्थितांना हसविले पाहिजे. त्यासाठी विनोदाचा जन्म हा वेदनेतून होत असतो असे विचार हास्यकवी विष्णू सुरासे यांनी सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीडच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाटन प्रसंगी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर या होत्या.यावेळी त्या म्हणाल्या की, स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या आनंदाचा दिवस असून यादिवशी विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांचाही गौरव करणारा हा कार्यक्रम असून यामधून विद्यार्थ्यांची शारीरिक,मानसिक,बौध्दिक समृध्दता वाढवी म्हणून त्यांच्या कला,गुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनातून विविध उपक्रम राबविले जातात.यासाठी विद्यार्थ्यांमध्ये विन्रमता आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे कर्म,आचरण,वागण,बोलन चांगल असाव.त्यासाठी जात,धर्म,पंथ,लिंग भेद मानू नये असे मत व्यक्त केले. अनेक कवींच्या कवितांच्या आधारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन त्यांनी या प्रसंगी केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग व प्राध्यापकांना विविध क्षेत्रात यश व कार्य केल्याबद्दल महाविद्यालयाच्यास वतीने सन्मानीत करण्यात आले. त्यात विद्यापीठाचा उत्कृष्ट स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम हा अमंलबजावणी पुरस्कार मिळाल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, डॉ.वाणी पी.आर. व मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रथम पुरस्कार एक लाख रुपये मिळाल्याबद्दल उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, जालिंदर कोळेकर, प्रा.शिवाजी राऊत यांना सन्मानीत करण्यात आले.

# जपानच्या सागा प्रांताच्या गव्हर्नरच्या शिष्टमंडळाने घेतली पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.९ फेब्रुवारी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्त्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली.पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते.



# तुलसी निवासी वसतिगृहात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलि तुलसी निवासी वसतिगृह, बीड येथे शनिवार दि.७ रोजी माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत, प्रा.गीतांजली वाघमारे, प्रा.किशोर वाघमारे, प्रा.मगन ओव्हाळ, माधुरी घुमरे, आणि वसतिगृह अधीक्षक वर्षा ढोकणे, सावंत यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई यांच्या त्यागमय जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कठीण परिस्थितीतही बाबासाहेबांना दिलेले पाठबळ, त्यांचे संघर्षमय जीवन आणि सामाजिक परिवर्तनात त्यांनी दिलेले योगदान विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आले. यानंतर माता रमाई जयंतीनिमित्त वसतिगृहात आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी वसतिगृहाचे कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे-डॉ हनुमंत सौदागर

## रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.९ फेब्रुवारी**

जिद्द चिकाटी मेहनत घेऊन यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री खोसे, प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर आदी उपस्थित होते. दहावीचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ शनिवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला . इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून स्वयंशासन दिन साजरा केला वर्गशिक्षक श्रीमती गिरी मॅडम यांनी मार्गदर्शन केले. निरोप समारंभाच्या कार्यक्रमात श्री देशमुख , श्रीमती डॉ गिरी,श्री गोरे,श्री गायकवाड,श्री नाईकनवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. पुढे बोलतांना डॉ सौदागर यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसिस्ती चे महत्व सांगितले. अध्ययन करत असताना अवधानाचे महत्त्व व सध्याच्या स्थितीमध्ये मुलांचे अवधान टिकवणे किती जिकरीचे झाले आहे याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना श्री खोसे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय ठरवून त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी कसे प्रयत्नशील राहावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक कदम याने तर सर्व नियोजन नववीच्या विद्यार्थ्यांनी केले आभार श्रीमती उगले यांनी केले.कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती यशोधरा बुद्धविहार येथे उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.९ फेब्रुवारी**

येथील फुलेनगर येथील यशोधरा बुद्ध विहार येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती शनिवार ७ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा (मुले) येथील आदर्श शिक्षिका वंदना मगरे होत्या. तर प्रमुख वक्त्या म्हणून ज्योतीताई साळवे व सरिता जाधव यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचा प्रारंभी तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले.



प्रमुख वक्त्या ज्योतीताई साळवे यांनी माता रमाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकतांना म्हणाल्या की माता रमाईंनी कौटुंबिक हालअपेष्टा सहन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणासाठी व समाजकार्यासाठी खंबीर साथ दिली. त्यांच्या त्याग आणि कष्टामुळेच आज समाज प्रगतीपथावर आहे. रमाईंचे उपकार आपण कधीही फेडू शकत नाही. तर सरिता जाधव यांनी रमाईंच्या जयंतीनिमित्त आदर्शाचे पालन करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप करताना वंदना मगरे म्हणाल्या की, जिजाऊ, सावित्री आणि रमाई या महामातांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज आहे. त्यांच्या विचारांनी चालण्याचा संकल्प आपण या जयंतीच्या निमित्ताने केला पाहिजे.

यावेळी कमलताई डोंगरे, महानंदा जावळे व सुशीलाताई चांदमारे यांनी माता रमाई यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी गीते सादर केली.कार्यक्रमाचे प्रस्तावित सुशीलाताई चांदमारे यांनी केले. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार सुनिता भीमराव टाकणखार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फुलेनगरमधील महिलामंडळ व यशोधरा बुद्ध विहार ट्रस्ट ने परिश्रम घेतले.

# महापशुधन एक्सपो मेळाव्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-नवनाथ शिराळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे

बीड जिल्ह्यातील परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १५०० विविध प्रकारची उत्कृष्ट माहिती देण्यात येणार आहे त्यामुळे या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

# शिवजयंती व रमजान सणाच्या पार्श्वभुमीवर विशेष स्वच्छता मोहिम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने व मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु होत असल्याने स्वच्छ, सुंदर बीडसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी पुढाकार घेतला आहे. नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत आ. विजयसिंह पंडित यांनी स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठ्याच्या आढावा बैठकीत शहरात विशेष स्वच्छता मोहिम प्रभागनिहाय सुरु करून बंद असलेले पथदिवे तात्काळ दुरुस्त करावेत, आवश्यक ठिकाणी नव्याने लाईट बसविण्यात यावेत, शहरातील नळ पाणी पुरवठा वेळेत करण्यात यावा, पाणी सुटण्याचे वेळापत्रक नागरीकांना कळविण्यात यावेत अशा सूचना पालिका प्रशासनाला दिल्या आहेत. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे गटनेते फारुक पटेल, स्वच्छता सभापती शेख निजाम, नगरसेवक मोईन मास्टर, नगरसेवक अमर नाईकवाडे यांची उपस्थिती होती.

शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी बीड नगर परिषदेच्या स्वच्छता, विद्युत व पाणी पुरवठा विभागाचा आढावा घेण्यात आला, यावेळी ते पालिका प्रशासनाशी बोलत होते.

# श्री छत्रपती राजर्षी शाहू बँकेचे जेष्ठ संचालक प्रा.विक्रम जाधव यांचे दु:खद निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

बीड येथील श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप.बँक लि., बीडचे जेष्ठ संचालक प्रा.विक्रम व्यंकटराव जाधव वय ७८ यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले.



प्रा.विक्रम जाधव हे उदगीर येथील शिवाजी महाविद्यालय येथे प्राध्यापक पदावरून सेवानिवृत्त झालेले होते. श्री छत्रपती शाहू बँकेमध्ये २०१५ पासून संचालक पदावर आज तागायत कार्यरत होते. सहकार क्षेत्रात संचालकपदी राहुन प्रामाणिक व दूरदृष्टीने दीर्घकाळ मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

प्रा.विक्रम जाधव यांच्यावर त्यांच्या मुळगावी रायमोहा ता.शिरूर का.जि.बीड येथे दि.०७.०२.२०२६ रोजी अंत्यंसस्कार करण्यात आले. या अंत्यविधी प्रसंगी बँकेचे अध्यक्ष इंजि.अजय पाटील, उपाध्यक्ष प्रा.नारायण मस्के, बँकेचे सर्व संचालक मंडळ, प्रतिष्ठीत नागरिक, अधिकारी व कर्मचारी, ग्राहक, नातेवाईक व स्थानिक ग्रामस्थ इ.उपस्थित होते.

कै.प्रा.विक्रम व्यंकटराव जाधव यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, भाऊ, भाऊजयी आदि परिवार आहे.

# उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा कालावधीत कलम १६३ प्रमाणे मनाई आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ फेब्रुवारी**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा आणि दि. २० फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. सदरील परीक्षा सुव्यवस्थीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून परीक्षा केंद्राच्या परिसरात जमाबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत.

परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असताना बाहेरच्या लोकांकडून उपद्रव होण्याची शक्यता असते. तसेच परिक्षा चालू असताना कॉपी पुरविण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेरॉक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता, परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचा-यानां बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये, तसेच जिल्हयात कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी जिल्हयातील फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा केंद्राचे १०० मिटर परिसरात परिक्षेचे साहित्य ठेवण्यात आलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी व अनाधिकृत कृत्य होऊ नयेत याकरिता खालील कृत्य करण्यास मनाई भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार आहे.

# करुणेचा महासागर, कर्तव्य निष्ठेची प्रेरणा, त्यागाचे प्रतिक, महासुर्याची सावली, कोट्यावधींची माऊली होती रमाई आंबेडकर सर्व महिलांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे- जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ फेब्रुवारी**

भारतीय बौध्द महासभा या मातृ संस्थेच्या विद्यमाने माता रमाई आंबेडकरांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात थाटा-माटात दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी बुध्द विहार कार्यालय भारतीय बौध्द महासभा बस स्टॅण्ड जवळ, बीड येथे संपन्न करण्यात आली.

सुरुवातीस सकाळी ८.३० वाजता. भारतीय बौध्द महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष अरुणाताई निसर्गन यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करुन धम्मध्वज वंदनेनंतर त्रिसरण-पंचशील सह वंदना घेवून सजवण्यात आलेल्या रथात माता रमाईच्या फोटोची बुध्द विहार संस्थेच्या कार्यालयापासून सवाद्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, राजुरीवेस, बलभीम चौक, धोंडीपुरा, माळीवेस मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत प्रभात फेरी घेवून आंबेडकर पुतळा येथे पंचशील ध्वजारोहन मुख्य कार्यक्रमानंतर ठीक ११.४५ वाजता बुध्द विहार कार्यालय भारतीय बौध्द महासभा येथे महिला जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे संस्कार विभाग प्रमुख जिल्हा उपाध्यक्ष वामन निकाळजे यांचे माता रमाई आंबेडकर यांचे जीवनावर आधारित प्रवचन घेण्यात आले. त्यावेळी अध्यक्षपदावरुन निसर्गन ताई बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वागत समारंभ घेण्यात आला. संस्थेच्या केंद्रीय शिक्षीका महिला जिल्हा उपाध्यक्षा कांताताई जाधव, केंद्रीय शिक्षिका संजीवनीताई गडगे, कें.शि.त्रिशलाताई राऊत, नेकनूर येथील निर्मळ ताई पती-पत्नीसह मंगलाताई लोखंडे, विजयाताई जोगदंड, चंद्रभागाताई साळवे, मस्के ताई, या महिलांनी श्रीलंका पर्यटन केल्यामुळे अरुणाताई निसर्गन आणि पद्मीनीताई गायकवाड यांच्या हस्ते वरील महिलांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच रमाई जयंतीचे औचित्य साधून संस्थेचे संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी काही सैनिकांना बढती देवून असिस्टंट युनीट लिडरपदी निवड करुन त्यांना सैनिक पदाची फित लावून जिल्हाध्यक्षा अरुणाताई निसर्गन आणि राजाभाऊ आठवले यांनी असिस्टंट लीडचे स्वागत केले. ते वामन निकाळजे, नंदाताई भंडारे, मंदाताई मस्के, शोभाताई आठवले यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात अरुणाताई निसर्गन यांनी आज खर्या अर्थाने माता रमाईच्या संघर्षमय आणि त्यागमय जीवनाचा प्रत्येक महिलांनी आदर्श घेवून आपले जीवन जगले पाहिजे असे आवाहन केले. मंचावर माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन गुरुजी आणि जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे तसेच भारतीय बौध्द महासभेच्या केंद्रीय शिक्षिका, शिक्षक, बहुसंख्य बौध्द बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गौतम खेमाडे यांनी केले व आभार बनसोडे गुरुजींनी केले. सरणात्तय होवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हॉकी स्पर्धेत नागपूर, ब्रम्हपूरी, नांदेड खालसा संघांचा विजय

## हॉकीचे रंगतदार सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठी गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**

जिल्हा हॉकी असोसिएशनद्वारा आयोजित स्व.दयानंद श्रीलेले स्वर्ण चषक स्पर्धेत दुसर्या दिवशी नागपुर पोलिस, ब्रम्हपुरी(चंद्रपुर) व नांदेड खालसा या संघानी प्रतिस्पर्धी संघाना पराभुत केले. आज सकाळी १०.३० वाजता मुंबई पोलिस विरुद्ध हिंगोली हा सामना होणार आहे.

सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी जिल्हा हॉकी असोसिएशन द्वारा आयोजित डेप्युटी कमिशन स्व.दयानंद श्रीलेले स्वर्ण चषक ऑल इंडिया हॉकी टुर्नामेंटमध्ये दुसर्या दिवशी रंगतदार लढती झाल्या. या सामन्याच्या वेळी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे, निवृत्त तालुका वैद्यकीय अधिकारी तथा जॉयन्ट्स ग्रुपचे अध्यक्ष डॉ.नामदेव कोरडे, वन अधिकारी संदीप वाघ, दिलीप काळे, नगरसेवक बाशिद मौलाना, कयुम, प्रा.सुखदेव बलखंडे, संस्कार ग्रुपचे प्रमुख राजीव जयस्वाल, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ढोकर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सकाळच्या सत्रात पहिला सामना नागपुर पोलिस व बाभुळगाव(लातुर) या दोन हॉकी संघात झाला. यामध्ये चार-दोन गोलने नागपुर संघाने विजय मिळविला असुन भारत राजपुत या खेळांडुला मॅन ऑफ दि मॅच सन्मान प्राप्त केला. दुसर्या सामन्यात ब्रम्हपुरी(चंद्रपुर) व यवतमाळ यांच्यात लढत झाली असुन ही लढत रंगतदार ठरली. यामध्ये ब्रम्हपुरीच्या संघाने यवतमाळ संघाच पराभव केला असुन या सामन्यात बॉबी मगंडे यास मॅन ऑफ द मॅच जाहिर करण्यात आला. तिसरा सामना नांदेड खालसा व नागपुर हॉकी ऍकादमी यांच्यात झाला. यामध्ये नांदेड खालसा संघाने विजय संपादन केला असुन मॅन ऑफ दी मॅच सुहास धोते या खेळांडुला देण्यात आला. या सामन्याचे पंच म्हणुन टेकनिकल परिक्षक राजकुमार झा यांनी काम पाहिले. तर पंच म्हणुन प्रशांत मिश्रा, उमेश यादव, सुजल डोंगरे, सचिन गावंडे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी असोसिएशनचे अध्यक्ष ओमप्रकाश श्रीलेले, सचिव प्रकाश वाघमारे, पदाधिकारी आयुब पठाण, गोविंद निलजेवार, शैलेश मुदीराज, जितेंद्र भट्ट, राजु लोहगावकर, कल्याण देशमुख, फुलचंद जयस्वाल, वसंत भट्ट, संजय शर्मा, वाजिद पठाण, शेषेराव कर्हाळे, संदीप मुदीराज, रमेश मुदीराज, ओमप्रकाश दुबे, अनिल मुदीराज, विशाल मुदीराज, सुभाष वाघमारे, ओमप्रकाश संदुल, सचिन शर्मा, आशुतोष श्रीलेले, अनेष तोटे, तुलशीदास चिलमुल, शुभम निजलेवार, विक्की मुदीराज, सुदांशु मुदीराज, हर्ष जयस्वाल, साई मुदीराज यांच्यासह सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. आज मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता मुंबई पोलिस व हिंगोली यांच्यात सामना होणार आहे.

# जिल्हा रूग्णालयात पिण्याचे पाणी, लिफ्टअभावी रूग्णांचे हाल

## जिल्हा रूग्णालय प्रशासन कुंभकर्णी झोपेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**

एकीकडे शासकीय रुग्णालय चकाचक होत असल्याचा दावा केला जात असताना, दुसरीकडे हिंगोली जिल्हा रुग्णालयात मूलभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचे फिल्टर मशीन बंद आहे, तर दोन महिन्यांपासून लिफ्टची सेवा ठप्प असल्याने रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना नरकयातना भोगाव्या लागत आहेत.

रुग्णालयाबाहेर असलेली पाण्याची टाकी देखील बंद अवस्थेत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णालय सोडून बाहेर भटकंती करावी लागत आहे. ज्या रुग्णांना चालणे अशक्य आहे, त्यांना वरच्या मजल्यावर नेण्यासाठी लिफ्ट बंद असल्याने नातेवाईकांना स्ट्रेचर ओढत किंवा रुग्णाला उचलून पायऱ्या चढवाव्या लागत आहेत. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे संताप व्यक्त होत आहे.

या बिकट परिस्थितीवर बोलताना रुग्णांच्या नातेवाईक नागेश राठोड यांनी कैफियत मांडतांना सांगितले की, गेल्या पंधरा दिवसांपासून पाण्याचे फिल्टर बंद आहे. रुग्णांना औषध घेण्यासाठी पाणी लागतं, पण इथं पिण्याचं पाणीही मिळत नाही. बाहेरची टाकीही कोरडी आहे. प्रशासनाला आमचं गाऱ्हाणं ऐकायला वेळ नाही का?

दोन महिने झाले लिफ्ट बंद आहे. आजारी माणसाला घेऊन पायऱ्या चढणं किती कठीण आहे हे प्रशासनाला समजत नाही का? रुग्णांच्या सोयीसाठी असलेल्या सुविधाच जर बंद असतील, तर या इमारतीचा काय उपयोग? तातडीने लिफ्ट आणि पाण्याची सोय करावी अशी प्रतिक्रीया रूग्णाचे नातेवाईक गजानन जाधव यांनी दिली.

एकीकडे नवीन एमआरआय मशीन तांत्रिक कारणास्तव बंद आहे, तर दुसरीकडे पाणी आणि लिफ्ट सारख्या अत्यावश्यक सेवाही बंद पडल्याने जिल्हा रुग्णालयाचा कारभार रामभरोसे असल्याचे चित्र दिसत आहे. निनाजी कांडेलकर यांनी आधीच या प्रश्नांकडे लक्ष वेधले होते, आता पुन्हा नागरिकांनी ही ओरड केली आहे.



# रूग्णालयात सुसज्ज यंत्रणा नावापूरती, एमआरआय सुविधा रखडली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**



येथील शासकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय आता नवनवीन अत्याधुनिक सुख-सुविधांनी सज्ज होत आहे. मात्र, कोट्यवधी रुपये खर्च करून आणलेली एमआरआय मशीन तांत्रिक कारणास्तव अद्यापही बंद अवस्थेत असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. शासनाने या गंभीर बाबीकडे जातीने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिक आता करू लागले आहेत.

जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधेसाठी स्वतंत्र सुसज्ज बिल्डिंग, हॉल आणि यंत्रसामग्री येऊन आता बराच कालावधी उलटला आहे. रुग्णालयाचा परिसर चकाचक झाला असून, काही कर्मचारी त्या ठिकाणी कामावरही तैनात दिसतात. मात्र, प्रत्यक्षात मशीन सुरू न झाल्याने गंभीर रुग्णांना खाजगी सेंटरवर धाव घ्यावी लागत आहे, जिथे हजारो रुपये मोजावे लागतात. प्रशासकीय स्तरावर सर्व 'जय्यत तयारी' झाल्याचा दावा केला जात असला, तरी तांत्रिक बिघाड किंवा परवानगीच्या कचाट्यात ही महत्त्वाची सेवा अडकली आहे.

या संदर्भात स्थानिक नागरिक निनाजी कांडेलकर यांनी प्रशासकीय दिरंगाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, जिल्हा रुग्णालयात सर्व सुविधा येत आहेत, ही आनंदाची बाब आहे. परंतु एमआरआय सारखी महत्त्वाची मशीन धूळ खात पडून असणे दुर्दैवी आहे. सुसज्ज बिल्डिंग आणि कर्मचारी असूनही जर सामान्यांना याचा लाभ मिळत नसेल, तर त्या यंत्रणेचा काय फायदा? शासनाने आणि आरोग्य विभागाने या विषयात जातीने लक्ष घालून ही सुविधा तात्काळ सुरू करावी.

# हिंगोली पोलिस वाहतुक शाखा ॲक्शन मोडवर

## वाहन चालविणाऱ्या अल्पवयीन मुलांमुलींना समज

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**



शहरात सध्या १८ वर्षांखालील मुलांकडून सर्रासपणे दुचाकी चालवल्या जात असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः शाळा आणि शिकवणी वर्गांच्या परिसरात शालेय विद्यार्थ्यांची ही 'बेशिस्त' वाहतूक शिस्तीचे धिंडवडे करत आहेत. यामुळे पादचारी आणि इतर वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. यासंदर्भात सोलापूर तरूण भारतने दि ८ रोजी वृत्त प्रकाशित करताच वाहतुक शाखेने वाहन चालविणाऱ्या अल्पवयीन मुलामुलींची वाहने पकडण्यास सुरूवात केली आहे.

हिंगोली शहरातील मुख्य चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी, तसेच शाळा, महाविद्यालयात अल्पवयीन मुलेमुली सर्रास वाहने आणून शाळा, महाविद्यालय सुटल्यानंतर डबल, ट्रीपल सीट सुसाट वाहने चालवित असतांना दिसत आहेत. या मुलीमुलींना वाहने देणाऱ्या पालकांवरही कार्यवाही आणि दंड लावणे जरूरी आहे.

सोमवारी वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मळे यांनी वाहतुक शाखेतील कर्मचाऱ्यांची शहरातील शाळा, महाविद्यालय तसेच मुख्य चौकात तैनाती करून अल्पवयीन मुलामुलींची वाहने पकडण्यास सुरूवात केली आहे. शहरातील मुख्य चौकात पोलिसांनी नाके लावून अल्पवयीन मुलामुलींना वाहन परवाने तपासण्यास सुरूवात केली आहे. या कार्यवाहीमुळे शहरातील अल्पवयीन मुलामुलींना आता चाप बसणार असून पालकांनीही पाल्यांना वाहने देऊ नये असे आवाहन वाहतुक शाखेने केले आहे.

# हिंगोलीत १२ फेब्रुवारीला २४ व्या धम्म परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**

शहरानजीक बळसोंड परिसरात असलेल्या शांतीनगर जेतवन प्रशिक्षण केंद्र परिसरात दि. १२ फेब्रुवारी गुरूवार रोजी २४ व्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. धम्मपरिषदेत विविध नामवंत भंतेजी उपस्थित राहून धम्मदेसना देणार आहेत. रात्री नामवंत गायकांचा भीम व बुद्ध प्रेरणा गितांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

हिंगोली येथील कालकथीत भंते काश्यप महाथेरो यांनी सुरू केलेल्या अकोला बायपास जवळील शांतीनगर बळसोंड शिवारातील जेतवन बौद्ध प्रशिक्षण केंद्राच्या वतीने

यंदा २४ व्या एक दिवसीय धम्म परिषदेचे आयोजन सोमवारी कै. अमृतलाल बगडीया नगरी मध्ये करण्यात आले आहे.

परिषदे निमित्त सकाळी ८:३० वाजता ध्वजारोहण भिख्खूसंघाच्या हस्ते होणार आहे, त्यानंतर दुपारी ठिक१ वाजता भदंत धम्मसेवक महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली धम्म परिषदेला प्रारंभहोईल.या वेळी माहाउपाक डॉ.एस.पी. गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन डॉ. भदंत उपगुप्त महास्थवीर यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेस विविध ठिकाणच्या भंत्तेजींची धम्मदेसना होणार आहे. उपस्थित भिक्खू संघ धम्मदेशना देणार आहेत. धम्मदेशने नंतर रात्री बुद्ध-भिम प्रेरण गितांचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे.

या धम्मपरिषदेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे व अवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य संयोजक भंते पञ्जारतन थेरो, सुप्रिया महिला मंडळ, धम्म परिषद संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस भरतीसाठी येणाऱ्या उमेवारांना आवाहन

हिंगोली- हिंगोली जिल्हा पोलीस घटकातील रिक्त पदासाठीची पोलीस भरती ही दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ पासून होणार असून बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांसाठी किंवा ज्या उमेदवारांना हिंगोली जिल्ह्यात राहण्याची सुविधा नाही त्यांच्यासाठी नवीन पोलीस वसाहत कम्युनिटी हॉल येथे सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे कुणीही रस्त्यावर किंवा ग्राउंडच्या बाजूला इतरत्र झोपू नये असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच पोलीस भरतीसाठी येताना सहा पासपोर्ट फोटो व ऑनलाइन अपलोड केलेले डॉक्युमेंट्स घेऊन यावे. तसेच पोलीस भरतीमध्ये सर्वत्र सीसीटीव्ही फुटेज व आर एफ आय डी सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची सुद्धा मदत घेण्यात आली असून कुणीही गैरप्रकार करनार नाही याबाबत काळजी घेतली आहे. तसेच कुणीही उत्तेजक द्रव्य किंवा पदार्थाचे सेवन करू नये स्टेरॉईड वगैरे घेऊ नये तसेच सामान्य शूज पेक्षा इतर स्पाईक शूज किंवा असामान्य शूज वापरू नये व किमती सामान सुद्धा सोबत आणू नये असे जिल्हा पोलीस अधीक्षक मा. डॉ. नीलाभ रोहन यांनी सांगितले आहे तसेच पोलीस भरती उमेदवारांचे नातेवाईक असणारे पोलीस अंमलदार यांना पोलीस भरती पासून दूर ठेवण्यात आले आहे. पोलीस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले आहे.

### ४१ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४१ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करीत वाहन चालकांकडून ४१ हजार २०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत २ ठिकाणी कारवाई करीत ३५५८० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

{XA}

# राष्ट्रमाता जिजाऊमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ फेब्रुवारी**



ॲड.ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेअंतर्गत असणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा पंडीत अवचार, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव पंडित शिरसाट, सुधाकर मेटकर, मुख्याध्यापक बल्लाळ होते आणि प्राचार्य उमेश शेळके तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भरोसा सेल पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक सौ, प्रेमलता जगताप ह्या होत्या, त्यांनी विद्यार्थ्यांना कायद्याबद्दल सखोल अशी माहिती दिली. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून अक्षय देविदास राठोड यांनी स्पर्धा परीक्षा बद्दल सखोल अशी माहिती दिली. विजयकुमार कांबळे, रवी शिरसाट, गायक विशाल इंगळे, आरती सावळे, सरनाईक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक बल्लाळ सरांनी केले.

मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावी तील विद्यार्थीनीं समिक्षा पुंडगे ह्या मुलीच्या स्टुडंट ऑफ दि इयर म्हणून सत्कार करण्यात आला. अध्यक्ष भाषणात पंडित अवचार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आभार प्रदर्शन शिवशंकर डोल्हारे यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक श्रीकांत कान्हेड, शिवशंकर डोल्हारे, अभिषेक चाटसे, विद्या कान्हेड, नुतन बल्लाळ, सुषमा पाईकराव, राजश्री पडघन, भाग्यश्री ठोके, ज्योती सोळंके, कांचन टेकाळे इ शिक्षक आणि शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इम्रान व नरवाडे ताईने पुढाकार घेतला.

# हार्ट फुलनेसकडून पोलिसांसाठी ध्यान व योग शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ फेब्रुवारी**

हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांच्या पुढाकाराने व हार्टफुलनेस संस्थेकडून पोलीस मुख्यालयात सात ते नऊ फेब्रुवारी दरम्यान सकाळी सात ते आठ यां वेळेत तीन दिवसाचे ध्यान व योग वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

शिथीलीकरणासह, सफाईसह आणि प्रार्थनेसह ध्यान अशी तीन विशेष सत्र यावेळी घेण्यात आली. पैठण येथून महाराष्ट्र ग्रामीण समन्वयक शशिकांत घेर, परभणी हिंगोली जिल्ह्याच्या झोनल कोऑर्डिनेटर डॉ. अंजली निरस व पुणे शहराचे झोनल कोऑर्डिनेटर नितीश जैन यांनी या ध्यान सत्रात ऑनलाईन ऑफलाइन मार्गदर्शन केले. तर योग मार्गदर्शनासाठी पतंजली योग समितीच्या वतीने जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, सह प्रभारी बालासाहेब हरण, कोषाध्यक्ष उमेश तोष्णीवाल, युवा सहप्रभारी बालाजी पालवे, हिंगोली तालुका युवा प्रभारी वैभव जाधव आदींची उपस्थिती होती. सत्राच्या यशस्वीतेसाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस उपाधीक्षक (गृह) दत्ता केंद्रे, पोलीस निरीक्षक शालिनी नाईक, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसांब घेवारे आदी सह विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वनविभागाने बिबट्याला पकडले

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ९ फेब्रुवारी :** मागच्या दोन आठवड्यापासून जळकोट तालुक्यातील तिरुका आणि परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्याला पकडण्यात वनविभागाला यश आले आहे. शनिवारी रात्री उशिरा बिबट्या वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. त्यामुळे तिरुका, डोंगरगाव, एकुरका परिसरातील शेतकरी, ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्र्वास सोडला आहे.

जळकोट तालुक्यातील तिरका शिवारातील अरविंद पाटील यांच्या शेतात आणि कोठ्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. या बिबट्याने आतापर्यंत परिसरातील दोन कुत्र्यांचा फडशा पाडला होता. त्यामुळे शेतकऱ्यांत भीती वाढली होती. त्याची माहिती मिळताच, वनविभाग, महसूल आणि पोलिस प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. वन परिमंडळ अधिकारी एम.बी. गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली १० ते १५ कर्मचाऱ्यांच्या पथकाने गेल्या तीन दिवसांपासून या भागात तळ ठोकला या गावांवरील संकट टळल्याने दिलासा...

बिबट्या पकडला गेल्याने तिरुका, डोंगरगाव, डोंगरकोनाळी, एकुरका आणि बोरगाव या परिसरातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे शेतकरी, नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.



## विविध वृत्त...

### राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत मृणाल पोतदारचे यश

**लातूर :** येथील द्रोणाचार्य स्पोर्ट्स फाउंडेशनची खेळाडू मृणाल नितीन पोतदार हिने दिल्ली येथे झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय बॅटमिंटन स्पर्धेत उत्कृष्ट खेळी करीत महाराष्ट्र संघाला कांस्यपदक पटकावून दिले आहे.

समर्थ कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या मृणालने १९ वर्षाखालील वयोगटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत हे नेत्रदीपक यश मिळवले आहे. प्राथमिक फेरीच्या सामन्यात आंध्र प्रदेश, केरळ संघावर मात करीत तिने उपान्त्य फेरीत प्रवेश मिळविला. मात्र राजस्थान संघाकडून महाराष्ट्राला हार पत्करावी लागली.

तृतीय क्रमांकाच्या सामन्यात तामिळनाडू संघाला हरवत या संघाने कांस्यपदक पटकाविले. या विजयात लातूरच्या मृणालची खेळी निर्णायक होती. तिला एनआयएस प्रशिक्षक प्रा.डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, सुशांत घाडगे, अविनाश अडसूळ यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाचे प्राचार्य प्रमोद चौधरी, क्रीडा शिक्षक किरण हाळीघोंगडे, महादेव स्वामी यांच्यासह बॅडमिंटन प्रशिक्षकांनी कौतुक केले आहे.

### लातुरात तीन टन गोमांस जप्त

**लातूर :** लातूर शहराच्या बाह्यवळण रस्त्यावरील उमाजी नाईक चौकात गोमांसाची वाहतूक करणाऱ्या एका टेम्पोला गोरक्षकांनी पाठलाग करून पडकले. सदर टेम्पोत सुमारे तीन टन गोमांस असल्याचा संशय आहे. सदर टेम्पो गोरक्षकाने पोलिसांच्या हवाली केला आहे. ही घटना रविवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडली. यात दोन लाख रुपयांचे गोमांस व २ लाख रुपयांचा पिकअप टेम्पो असा एकूण ४ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

रविवारी सकाळी शहराच्या १० च्या सुमारास फिर्यादी गोरक्षक ज्योतीराम शेषराव क्षीरसागर (रा. सिकंदरपूर ता. जि. लातूर) हे शहराच्या राजीव गांधी चौकात थांबले होते. त्याचवेळी धाराशिवकडून भरधाव वेगात एक पिकअप टेम्पो (एम एच २४ - ए यू ५२९२) कट मारून बाह्यवळण रस्त्याने गरूड चौकाकडे निघाला होता. त्यातून लाल रंगाचे पाणी टिपकत असल्याचे फिर्यादी ज्योतीराम क्षीरसागर यांच्या निदर्शनास आले. एका होमगार्डला सोबत घेऊन क्षीरसागर यांनी त्याचा पाठलाग करून टेम्पोला थांबविले. आत काय आहे, असे विचारले असता उत्तर देण्यास टाळाटाळ सुरू केली. तोपर्यंत क्षीरसागर यांनी ११२ ला फोन करून कल्पना दिली होती. रस्त्यात टेम्पो थांबल्याने नागरिक व वाहनधारकांची गर्दी झाली होती. सदर टेम्पो शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. पोलिसांनी आरोपी शोएब शमशोद्दीन शेख (रा. खाजा नगर, धाराशिव) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

### विद्यार्थ्यांकडून श्रमदान सक्तीचा निर्णय रद्द करण्याची मागणी

लातूर : नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना श्रमदानाच्या नावाखाली सक्तीने राबवून घेण्याचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या मराठवाडा विद्यार्थी आघाडीने केली आहे.

या मागणीसाठी मराठवाडा विद्यार्थी आघाडीचे अध्यक्ष प्रीतम दंडे यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कुंभमेळ्यात श्रमदान करण्यास विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुण देण्यात येणार नाहीत, असा धमकीवजा इशारा देण्यात आला असून हा प्रकार अत्यंत निंदनीय आणि धर्मनिरपेक्ष विद्यार्थ्यांसाठी जाचक आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारे श्रमदानाच्या नावाखाली राबवून घेण्याचा आदेश काढणाऱ्या कुलगुरूंचा व्ही. एस. पँथर्स संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे.तसेच हा जाचक निर्णय तात्काळ रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या निवेदनावर व्ही. एस. पँथर्स विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष सुरज कांबळे, शहर उपाध्यक्ष महेश सोनवणे, शहर सचिव रोहित दंडे, शहर संघटक रितेश जांभळे, सुदर्शन ओहळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### शिवजयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी धोंडगे

**चाकूर :** प्रतिवर्षाप्रमाणे साजऱ्या केल्या जाणाऱ्या चाकूर सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी वैभव धोंडगे यांची तर उपाध्यक्षपदी दत्ता सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे.यावेळी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत सचिव अविनाश भोरे, मिरवणूक प्रमुख कृष्णा धोंडगे, महेश साळुंखे, सजावट प्रमुख राहुल माने, दिपक नवरखेले यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक भागवत फुले, विजयकुमार झांबरे, सुमित सोनटक्के, महेश धोंडगे, मंगेश धोंडगे, गणेश साळुंखे, सिद्धेश्र्वर सोमवंशी, राम सोमवंशी, परमेश्र्वर सोमवंशी, विनोद फुले, सिद्धांत धोंडगे, गणेश गोरे, मंगेश मोरे, योगेश मोरे, दत्ता मोरे, राम डाके, विलास मोरे, बालाजी क्षीरसागर, प्रसाद झांबरे, अविनाश झांबरे, पुंडलिक सोमवंशी, आशितोष धोंडगे, खंडोबा मोरे, किशोर मोरे, रोहित मोरे, राहुल माने, कृष्णा नवरखेले, मनोज डाके, दीपक नवरखेले, अनिकेत नवरखेले, नारायण सोमवंशी, आकाश फुले, गणेश भोरे, पृथ्वीराज माने, आकाश माने, प्रदीप माने, मनीष माने, प्रशांत साळुंखे, अवधूत झांबरे, मनोज धोंडगे, आशुतोष झांबरे आदीचीं उपस्थिती होती.

# लातूरच्या महापौर - उपमहापौरांची बिनविरोध निवड

## लातूर शहर महानगरपालिकेवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ फेब्रुवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौरपदी अपेक्षेप्रमाणे काँग्रेसच्या जयश्री सोनकांबळे यांची तर उपमहापौरपदी एड. स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड झाल्याचे पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी घोषित केले. लातूर मनपामध्ये काँग्रेसने ४३ तर काँग्रेससोबत आघाडी केलेल्या वंचित बहुजन आघाडीने ४ अशा एकूण ४७ जागा जिंकून आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे.



महापौर - उपमहापौरांच्या निवडीचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर या पदासाठी काँग्रेससोबत वंचितकडून महापौर पदासाठी निकिता सोमवंशी यांनी तर उपमहापौर पदासाठी सचिन गायकवाड यांनीही उमेदवारी दाखल केली होती. मात्र, आज या पदांची निवड होण्यापूर्वी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण जाधव व वंचितचे मराठवाडा सचिव संतोष सूर्यवंशी यांच्यात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत वंचित बहुजन आघाडीला पुढच्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी उपमहापौर पद तर स्थायी समितीमध्ये दोन सदस्य तसेच महिला व बालकल्याण समिती आणि परिवहन समितीमध्ये एक सदस्याला संधी देण्याचेही काँग्रेसने निश्र्चित केल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वंचितच्या दोन्ही उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने महापौर - उपमहापौर पदांची निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.

लातूर शहर महानगरपालिकेवर मागच्या कालावधीतील अडीच वर्षाचा कार्यकाळ वगळता काँग्रेसचाच महापौर राहिला आहे. भाजपला केवळ अडीच वर्ष मनपाची सत्ता उपभोगता आली. यावेळच्या निवडणुकीत भाजप पूर्ण बहुमतात मनपामध्ये सत्तेत येईल असा अंदाज वर्तवला जात होता. परंतु भाजप शहरात बहुमतापर्यंत पोहोचण्यात सपशेल अपयशी ठरली. मनपाच्या स्थायी समिती तसेच अन्य विषय समितीच्या निवडीवरही काँग्रेसचेच वर्चस्व राहणार असल्याने त्या पदासाठी काँग्रेस येणाऱ्या काळात कोणाला संधी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लातूर जिल्हा परिषदेवर भाजप - राष्ट्रवादी (अप) महायुतीचा ताबा

## काँग्रेस २३, भाजप १८, राष्ट्रवादी ( अजित पवार) १२ जागांवर विजयी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ फेब्रुवारी :** संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या लातूर जिल्हा परिषदेवर भाजप - राष्ट्रवादी (अजित पवार) महायुतीने ताबा मिळवण्यात यश संपादन केले. लातुरात सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या काँग्रेसने २३ जागा जिंकल्या. भारतीय जनता पार्टीला १८, राष्ट्रवादी ( अजित पवार) १२, राष्ट्रवादी (शरद पवार) १, शिवसेना शिंदे १, शिवसेना( उबाठा) १, मनसेने १ तर अपक्षांनी दोन जागा जिंकल्या आहेत.

जिल्हा परिषद - पंचायत समितीच्या शनिवारी पार पडलेल्या मतदानाची मतमोजणी सोमवारी पार पडली. यामध्ये प्रमुख राजकीय पक्षांनी वरीलप्रमाणे जागा जिंकल्या. मागच्या जिल्हा परिषदेवरही भाजपचा ताबा होता. या निवडणुकीत भाजप स्वबळावर सत्तेत येऊ शकली नाही. यावेळी भाजपला केवळ १८ जागांवर समाधान मानावे लागले. मात्र, भाजपसोबत राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसने भाजप पाठोपाठ १२ जागा जिंकून महायुतीकडे सत्ता राखण्यात यश मिळवले आहे.

या निवडणुकीत शरद पवार राष्ट्रवादीला एकाच जागेवर विजय मिळवता आला. राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने रेणापूर तालुक्यात एक जागा जिंकून जिल्ह्याच्या राजकारणात प्रवेश करण्यात यश मिळवले आहे. दोन्ही सेना या निवडणुकीत फारसा प्रभाव दाखवू शकल्या नसल्याचे दिसून आले. जिल्हा परिषदेत भाजप - राष्ट्रवादी (अप) महायुती सत्तेत येणार हे निश्र्चित आहे. महायुती नसती तर मात्र लातूर जिल्हा परिषद त्रिशंकू अवस्थेत राहिली असती. भाजपकडून या निवडणुकीत मोठी यंत्रणा कार्यान्वित होती. त्या तुलनेत आ. अमित देशमुख यांनी स्वतः या निवडणुकीची सूत्रे हाती घेऊन एकट्याच्या बळावर जिल्हा परिषदेत सर्वाधिक जागा जिंकण्याचे काम केले आहे. अजूनही जिल्ह्याच्या राजकारणात काँग्रेसची चलती आहे, हे या निमित्ताने मान्य करावेच लागेल.

| तालुका | विजयी उमेदवाराचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| औसा ९ गट | | |
| किल्लारी गट | सुभाष पवार | काँग्रेस |
| आशिव | सई गोरे | काँग्रेस |
| उजनी | संदीपान शेळके | भारतीय जनता पार्टी |
| खरोसा | तानाजी जाधव | उबाठा |
| लोदगा | सौ. पूनम मुक्ता | भारतीय जनता पार्टी |
| मातोळा | दिपाली भोसले | काँग्रेस |
| भादा | छाया चिंचोलकर | भारतीय जनता पार्टी |
| लामजना | शालिनी चव्हाण | काँग्रेस |
| आलमला | शीतल चिलमे | भारतीय जनता पार्टी |
| लातूर १० गट | | |
| आर्वी | राजश्री धनंजय देशमुख | काँग्रेस |
| भातांगळी | महादेव गुलाब साळुंके | भारतीय जनता पार्टी |
| महाराणा प्रतापनगर | महादेव मस्के | काँग्रेस |
| पाखरसांगवी | सोनाली रमेश थोरमोटे | काँग्रेस |
| हरंगुळ बु. | भगीरथी शिवानंद पाटील | काँग्रेस |
| काटगाव | अश्विनी शिंदे | काँग्रेस |
| तांदुळजा | श्रीकांत माने | काँग्रेस |
| मुरुड | जयश्री लक्ष्मीकांत तवले | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| निवळी | दिपाली आदमाने | काँग्रेस |
| एकुरगा | दत्तात्रय टेंकाळे | काँग्रेस |
| रेणापूर ४ गट | | |
| खरोळा | शिवकन्या गोडभरले | भारतीय जनता पार्टी |
| पानगाव | सुनील नागरगोजे | मनसे |
| पोहरेगाव | मनिषा कदम | काँग्रेस |
| कामखेडा | आशाताई भिसे | काँग्रेस |
| अहमदपूर ६ गट | | |
| खंडाळी | शीतल खोमणे | राष्ट्रवादी शरद पवार गट |
| हडोळती | अजिक्य देशमुख | भारतीय जनता पार्टी |
| शिरुर ताजबंद | उत्तम संभाजी माने | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| किनगाव | प्रतिक्षा गुटे | भारतीय जनता पार्टी |
| रोकडा सावरगाव | अश्विन नागराळे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| अंधोरी | प्रफुल्लचंद्र गुंडरे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| जळकोट ३ गट | | |
| गुत्ती | शांताबाई अदावळे | काँग्रेस |
| माळहिप्परगा | नागेश्वरी केंद्रे | काँग्रेस |
| वांजरवाडा | धम्मापाल देवशेट्टे | अपक्ष |
| देवणी ३ गट | | |
| बोरोळ | औदुंबर पांचाळ | काँग्रेस |
| वलांडी | उषाताई पाटील | भारतीय जनता पार्टी |
| जवळगा | रामलिंग शेरे | भारतीय जनता पार्टी |
| शिरूर अनंतपाळ २ गट | | |
| साकोळ | माणिक गायकवाड | काँग्रेस |
| येरोळ | तुळजाबाई लोढे | भारतीय जनता पार्टी |
| चाकूर ५ गट | | |
| जानवळ | दयानंद सुरवसे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| चापोली | रंजना चाटे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| रोहीणा | उषा सोनकांबळे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| वडवळ ना. | भानुदास पोटे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| नळेगाव | अमर पाटील | भारतीय जनता पार्टी |
| उदगीर ७ गट | | |
| वाढवणा बु. | रामचंद्र तिरुके | भारतीय जनता पार्टी |
| सोमनाथपूर | उषा मुमनाजी भुजबळे | भारतीय जनता पार्टी |
| नळगीर | रूपाली गायकवाड | काँग्रेस |
| निडेबन | डॉ. दीपक सोमवंशी | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| लोहारा | मुकेश भालेराव | काँग्रेस |
| हेर | दिलीपकुमार मटके | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| तोगरी | ज्ञानेश्वर बिरादार | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| निलंगा १० गट | | |
| निटूर | रोहित पाटील | भारतीय जनता पार्टी |
| अंबुलगा बु. | चंद्रकांत होरे | भारतीय जनता पार्टी |
| लांबोटा | मानसी मस्के | काँग्रेस |
| दापका | शाहीद पटेल | काँग्रेस |
| हलगरा | तानाजी बिराजदार | भारतीय जनता पार्टी |
| औराद शहाजानी | योगीता जाधव | काँग्रेस |
| मदनसुरी | शरयू माने | शिंदे शिवसेना |
| सरवडी | कविता गोरे | भारतीय जनता पार्टी |
| कासार शिरसी | उमाजी उमापुरे | राष्ट्रवादी अजित पवार गट |
| तांबाळा | मीरा तुबकले | अपक्ष |

# वैशाली बुद्ध विहारात रमाई जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ फेब्रुवारी :** येथील बौद्धनगरमधील वैशाली बुद्ध विहार येथे माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रमाई अभिवादन व बुद्ध वंदनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाईच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली.

यावेळी बोलताना विहारचे सचिव केशव कांबळे यांनी रमाईची सहनशीलता आणि कष्ट समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. रमाई भिमराव आंबेडकर यांच्या संसाराचा गाडा चालवत. त्या संसार चालवताना, जे कष्ट रमाईने घेतले त्यात सहनशीलता हा गुण फार महत्त्वाचा आहे. शेण गोळा करून

गोवऱ्या विकून शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या बाबासाहेबांना संसाराची झळ बसू दिली नाही. कष्ट करून संसार काटकसरीने केला. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब, बॅरिस्टर आणि या देशाचे घटनाकार झाले. त्यात रमाईचा फार मोठा हातभार होता. सहनशीलतेने कष्ट करून दारिद्यावर रमाईने मात केली, हे समजून घेऊन आजच्या स्त्रियांनी रमाईची सहनशीलता व कष्ट समजून घेऊन आपला संसार सुखाचा करावा, असे आवाहन केले.

यावेळी सूर्यभान लातूरकर, गौतम चिकाटे, उत्तम गायकवाड, हरिश्र्चंद्र सुरवसे, आनंद कांबळे, उदय सोनवणे, जगन्नाथ सुरवसे,

अशोकराव सातपुते, आशा बानाटे, कालिंदा अंगारखे, छाया कांबळे, लता चिकटे, आशा गायकवाड, लता मगर, रमा चिकटे आदी, उपासक, उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नवीन रिंग रोडच्या कामाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ फेब्रुवारी :** लातूर शहराच्या गावालगत असलेल्या नवीन रिंग रोडच्या कामाला तब्बल पाच वर्षांनंतर पुन्हा प्रारंभ झाला आहे. कव्हा शिवारात मातीकाम सुरू झाल्यामुळे हा नवीन रिंग रोड लवकरच सुरू होईल, अशा हालचाली दिसून येत आहेत. जवळपास १५ वर्षापासून नवीन रिंग रोडच्या कामाची प्रक्रिया सुरू आहे.

पेठ, चांडेश्र्वर, कव्हा, सिरसी, कातपूर, बाभळगाव, सोनवती, भातखेडा असा हा नवीन रिंग रोड तयार होत आहे. लातूर शहरातून गेलेल्या बाह्यवळण रस्त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. परिणामी, वाहनधारकांची डोकेदुखी वाढली आहे. राजीव गांधी चौक ते बाभळगाव नाका-नांदेड नाका मार्गावर वाहतुकीचा खोळंबा नेहमीच होत आहे. शिवाय, बार्शी रोडवरील पाच नंबर चौक ते छत्रपती चौक मार्गही वाहतूक कोंडीत अडकत आहे. एमआयडीसीतून गेलेला रिंग रोड नवीन रेणापूर नाका, डी मार्टमार्गे नांदेड नाक्याला मिळतो; परंतु हा रस्ता खड्डेमय झाल्याने वाहनधारकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सध्या असलेल्या रिंग रोडवर वाहतुकीची समस्याही गंभीर होत चालली आहे. अवजड वाहनांना मार्ग मिळणे कठीण झाले आहे. लातूर तालुक्यातील कव्हा शिवारात अधिग्रहण करण्यात आलेल्या रिंग रोडचे मातीकाम सुरू करण्यात आले आहे. हा रस्ता तब्बल दीडशे फूट रुंदीचा असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

कव्हा शिवारात मातीकाम सुरू झाल्याने महामार्ग विभागाकडून अधिग्रहण करण्यात आलेल्या जमिनी ताब्यात घेण्यात येत आहेत. लातूरच्या बाहेरून रिंग रोड काढण्यासाठी १५ वर्षांपूर्वी प्रक्रिया सुरू झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाने



जमिनी संपादित केल्या असून शेतकऱ्यांना शासन दराप्रमाणे मोबदलाही देण्यात आला आहे.

लातूर शहर व जिल्ह्याच्या वाहतूक व्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ६० किलोमीटर लांबीच्या चारपदरी लातूर आउटर रिंग रोड प्रकल्पाला मोठी गती मिळाली आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी तज्ज्ञ एजन्सीची नियुक्ती करण्याकरिता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

लातूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी, जड वाहने, शहरांतर्गत दळणवळणावरील ताण आणि अपघातांची संख्या लक्षात घेता आउटर रिंग रोडची गरज अनेक वर्षांपासून नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. हा आउटर रिंग रोड पूर्ण झाल्यानंतर शहरात न शिरता बाह्यमार्गाने वाहतूक होणार असून, त्यामुळे लातूर शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. हा आउटर रिंग रोड चार पदरी असणार असून त्याची लांबी सुमारे ६० किलोमीटर असणार आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न कर्नाटक विधानसभेत मांडणार !

## कर्नाटक भाजप प्रदेशाध्यक्ष आ. बी. वाय. विजयेंद्र यांचे खा. अशोक चव्हाण यांना आश्वासन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ९ फेब्रूवारी-**

नांदेड ते बिदर हा बहुप्रतिक्षित नवीन रेल्वे मार्ग कर्नाटकातील विद्यमान राज्य सरकारकडून मंजुरी न मिळाल्यामुळे रखडला असून, हा प्रश्न कर्नाटक विधानसभेच्या येत्या अधिवेशनात मांडणार असल्याचे आश्वासन कर्नाटकचे भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार बी. वाय. विजयेंद्र यांनी दिले आहे. माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी हे स्पष्ट केले.

नांदेड येथे ५ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या जगद्गुरु केदार पीठाधीश्वर श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पट्टाभिषेक रजत महोत्सव व विश्वशांती महायज्ञ सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आ. बी. वाय. विजयेंद्र यांचे सोमवारी सकाळी शहरात आगमन झाले. यानिमित्ताने त्यांनी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.



या भेटीवेळी वरिष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी तसेच नांदेड जिल्हा रेल्वे समितीचे सचिव व वरिष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे उपस्थित होते. याप्रसंगी खा. अशोकराव चव्हाण यांनी नांदेडबिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, केंद्र व राज्य सरकारांच्या ५०:५० खर्च भागीदारीतून हा प्रकल्प राबविण्यास केंद्र सरकारने संमती दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील भाजप सरकारने या रेल्वे प्रकल्पातील आपल्या हिस्स्याचा खर्च उचलण्याबाबत मंत्रिमंडळ निर्णय घेतला आहे. मात्र, कर्नाटक राज्य सरकारकडून अद्याप या प्रकल्पासाठी खर्चाची जबाबदारी स्वीकारण्यास मंजुरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प रखडल्याची खंत व्यक्त करून खा. अशोकराव चव्हाण यांनी आ. बी. वाय. विजयेंद्र यांना कर्नाटक राज्य सरकारच्या पातळीवर तसेच कर्नाटक विधानसभेत हा विषय प्रभावीपणे मांडण्याची मागणी केली. संजीव कुलकर्णी व शंतनू डोईफोडे यांनीही या चर्चेत आपल्या सूचना मांडल्या.

हा रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यास नांदेड येथील श्री हजूर साहिब आणि बिदर येथील नानक झिरा साहिब ही दोन अत्यंत महत्त्वाची शीख तीर्थक्षेत्रे थेट रेल्वे मार्गाने जोडली जाणार आहेत. त्यामुळे भाविकांची मोठ्या प्रमाणावर सोय होणार असून, पर्यटन, व्यापार व रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. तसेच नांदेड ते बंगळुरू दरम्यानचे रेल्वे अंतरही लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. नांदेडकरांच्या भावना लक्षात घेऊन आ. बी. वाय. विजयेंद्र यांनी कर्नाटक विधानसभेच्या येत्या अधिवेशनात नांदेडबिदर रेल्वे मार्गाचा प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे आश्वासन दिले. या भेटीच्या वेळी आ.श्रीजया चव्हाण, दक्षिण बिदरचे भाजप आमदार डॉ. शैलेंद्र बेलदळे, बिदर जिल्हा भाजप अध्यक्ष सोमनाथ पाटील, बंगळुरू शहरातील भाजप नेते सिद्धेश, नांदेड महानगरपालिकेतील भाजप गटनेते ॲड. महेश कनकदंडे, किशोर स्वामी आदी उपस्थित होते.

# काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ९ फेब्रूवारी-**

मुदखेड तालुक्यातील पार्डी वैजापूर येथील काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला असून. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अप्पाराव पाटील यांच्यासह सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष चक्रधर पाटील पवार , उपसरपंच ज्ञानेश्वर पवार यांनी पुन्हा भाजपात प्रवेश केला असून . काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे .

पार्डी वैजापूर या गावाची नाळ काँग्रेस पक्षाच्या विचारधारेशी जोडली गेली होती . यापूर्वीच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पाठीशी खंबीर उभे राहून ग्रामस्थांनी मोठे मताधिक्य मिळून दिले होते . यापूर्वी अनेक वेळा भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवेशासाठी प्रयत्न केले होते . परंतु काँग्रेसशी एकनिष्ठ असल्याने या गावातील लोकांनी भाजपात प्रवेश करण्यास नकार दिला होता . आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा तालुका समन्वय गोविंदराव शिंदे नागेलीकर यांनी फिल्डिंग लावून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे मने वळविण्याचा प्रयत्न केला . कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अप्पाराव पाटील सरपंच बाळासाहेब पाटील पार्डीकर राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांचे विश्वासू म्हणून ओळखले जातात .

सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष चक्रधर पाटील पवार उपसरपंच ज्ञानेश्वर पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी खासदार अशोक चव्हाण , आमदार श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपात प्रवेश केला आहे . यामुळे काँग्रेस पक्षाला मोठा धक्का मानला जात असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी भाजपने मोट बांधण्यास सुरुवात केली आहे . यावेळी भाजप तालुका अध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर ,गोविंदराव शिंदे नागेलीकर , भाजप सरचिटणीस बाळासाहेब देशमुख , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक निलेश देशमुख , माजी उपसभापती उद्धवराव पवार निवघेकर , शामराव पाटील वैजापूरकर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते .



## हिमायतनगर येथे माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**हिमायतनगर** -येथील नालंदा बुध्द विहारात ७फेब्रुवारी रोजी त्याग मुर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी भारतीय बौध्द महासभा शाखा हिमायतनगर तथा महीला समीतीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळीच नालंदा बुध्द विहार या ठीकाणी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करून त्यात माता रमाई यांच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले. सकाळच्या प्रथम सत्रात प्रा. सघपाल इंगळे यांचे व्याख्यान संपन्न झाले. तसेच माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर तथा काँग्रेस कमीटीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी भेट देऊन रमाई जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष दादा राठोड, प्रा. गजानन सुर्यवंशी , नगराध्यक्ष रफीक शेठ,मा. नगराध्यक्ष अखिल भाई, ईलीयास भाई संतोष मुदेवाड, बाळू मेंडके, शेख अफरोज, श्याम ढगे, बलपेलवाड यासह अनेक जनउपस्थिती होते. भारतीय बौध्द महासभेच्या वतीने हा कार्यक्रम यशस्वी संपन्न करण्यासाठी भारतीय बौध्द महासभा तालुका अध्यक्ष प्रताप लोकडे, सुरेश गडपाळे, बाबासाहेब मुनेश्वर, भालचंद्र पोपलवार, कोडीराम हनवते, सुरेश लोखंडे, चंद्रकांत हाणवते तथा महीला जयंती महोत्सव समीती तथा भारतीय बौध्द महासभा महीला पदाधिकारीची उपस्थिती होती

## अर्धापूर येथे आज मोफत ताण-तणाव निवारण व मानसिक आरोग्य' शिबिर

**अर्धापूर** -श्री गुरुगोविंद सिंघजी स्मारक शासकीय रुग्णालय, नांदेड आणि जिल्हा मानसिक आरोग्य सेवा कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रेरणा प्रकल्प' अंतर्गत अर्धापूर येथे भव्य मानसिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ग्रामीण रुग्णालय, अर्धापूर येथे पार पडणार आहे. ग्रामीण रुग्णालय, अर्धापूर येथे दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० ते दुपारी ०१:०० वाजेपर्यंत शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये विविध मानसिक समस्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत औषधोपचार व समुपदेशन केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मानसिक रोग, डिप्रेशन (नैराश्य), सततचे टेन्शन आणि बेचैनी,जुनाट डोकेदुखी आणि झोपेचे विकार,व्यसनमुक्ती समस्या,फिट्स येणे, लैंगिक समस्या, वृद्धापकाळातील विसरभोळेपणा,तसेच भानामती, करणी यांसारख्या गैरसमजातून निर्माण होणारे मानसिक आजारावर उच्चार व मार्गदर्शन दिले जाणार आहे. रुग्णांनी आपली जुनी वैद्यकीय कागदपत्रे आणि पूर्वी घेतलेल्या उपचारांचे सर्व रिपोर्ट सोबत आणावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विद्या रामचंद्र झिने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शाहू शिराढोणकर यांच्यासह ग्रामीण रुग्णालय अर्धापूरचे सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## उमरी तालूकास्तरीय स्पर्धेत मॉडर्न स्कुलचे घवघवीत यश

**उमरी**-उमरी तालूकास्तरीय वकृत्व आणि गायनाचे स्पर्धेत मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय उमरीच्या विद्यार्थीनींनी तालूक्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे नावलौकिकात भर टाकली आहे. दिनांक ५फेब्रुवारी २०२६ ते ७ फेब्रुवारी २०२६ मध्ये उमरी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सतिश दर्शनवाड यांचे संकल्पनेतून उमरी येथे तालुकास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १४ वर्षा खालिल गटातुन मॉडर्न इंग्लिश स्कूलमधील इयत्ता ८ वीतील विद्यार्थीनी मराठे आराध्या सुरेश हिने वकृत्व स्पर्धेत आणि जोशी सुखदा शरद हिने गायन स्पर्धेत उमरी तालूक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी तालूका स्तरिय स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिस वितरण भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस सौ. पुनमताई पवार, महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत ह. भ. प. साईनाथ महाराज बितनाळकर यांचे शुभहस्ते आणि गटशिक्षणाधिकारी सतिश दर्शनवाड, गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख, केंद्र प्रमुख सतिश पाटील, कै. गिरीश देशमुख गोरठेकर इंग्लिश स्कूलचे प्राचार्य विश्वजीत देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत कै. गिरीश देशमुख गोरठेकर इंग्लिश स्कूलचे प्रांगणात हा बक्षिस वितरण कार्यक्रम थाटात पार पडला. मॉडर्नच्या यशस्वी विद्यार्थीनींचे मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी, संचालिका सौ. सायली कुलकर्णी (अपसिंगेकर) संचालिका सौ. सानिका कुलकर्णी (सराफ), उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी आणि शाळेतील शिक्षक वृंदानी अभिनंदन केले.



# आदमपुरात पशुवैद्यकीय दवाखान्यात कर्मचाऱ्यांची वाणवा

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. ९ फेब्रूवारी-**



बिलोली तालुक्यातील मौजे आदमपूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात मान्यता असलेल्या ५ पदांपैकी ४ पदे रिक्त असल्याने केवळ पशुधन विकास अधिकारी डॉ. संकेत पापुलवाड या एकच अधिकाऱ्यावर दवाखान्याचा कारभार चालत असल्याने येथे तात्काळ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावीत,अशी येथील ग्राम पंचायत सदस्य गंगाधर पंगलवार यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे रीतसर मागणी केली आहे.

येथील पशुवैद्यकीय प्रथम श्रेणी दवाखान्यात आदमपूर सह मिनकी, मुतन्याळ, टाकळी (खु), अटकळी, बोरगांव,आळंदी, केरूर, गळेगांव या ९ गावातील नागरिक,शेतकरी पशुपालक आपल्या गाय,बैल म्हैस, मेंढी,शेळी, घोडा,गाढव,श्वान,मांजर,कोंबडे आदि आजारी पडलेल्या जनावरांना या ठिकाणी उपचार करण्यासाठी घेऊन येत असतात. परंतु,सदरील पशुवैद्यकीय दवाखान्यात गेल्या अनेक महिन्यांपासून पशुधन पर्यवेक्षक,पट्टी बंधक,दोन सेवक असे एकूण चार पदे रिक्त आहेत.त्यामुळेच एकाच मुख्य अधिकाऱ्यांवर याचा ताण पडत असून,परिसरातील शंकरनगर येथेही अतिरिक्त कार्यभार असल्याने अधूनमधून जावे लागते.या गैरसोयीचा त्रास पशुधन बाळगणाऱ्या पशुपालकांना सोसावा लागत आहे.संबंधित शासनाने येथील रिक्त असलेल्या पदांवर मनुष्यबळ नियमानुसार पुरवावेत, अन्यथा पशुपालकांच्या वतीने येथील पशु वैद्यकीय दवाखान्यास कुलूप लावण्याचा इशारा येथील ग्रामपंचायत सदस्य तथा भूतपूर्व पत्रकार गंगाधर पंगलवार यांनी निवेदनाद्वारे प्रशासनास दिला आहे.

# चंद्र-सूर्य असेपर्यंत आपण रमाई जयंती हा दिवस विसरू शकत नाही : शहाजी उमाप

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ९ फेब्रूवारी-**



प्रज्ञा सूर्याची सावली ठरलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त रमाई महिला मंडळ वसरणी यांच्या विद्यमाने दिनांक ७ फेब्रुवारी २९२६ रोजी सकाळी व्याख्यान प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपमहासंचालक नांदेड यांनी बोलताना म्हणाले की या महामानवाचे अर्थात माता रमाई भिमराव आंबेडकर यांना आपण जोपर्यंत चंद्र सूर्या आहेत तोपर्यंत या त्यागाच्या प्रकाशाला विसरू शकत नाही असे मत मांडले.

वसरणी येथील सुजाता बुद्ध विहार येथे दिनांक ७ फेब्रुवारी रोजी माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या थाटामाटात उत्साहाने साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नांदेडचे पोलीस उपमहासंचालक शहाजी उमाप यांनी सकाळी ठीक ११:३० वाजता पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर माता रमाईच्या जीवन चरित्रावर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस उपमहासंचालक शहाजी उमाप यांनी आपल्या मनोगतात म्हणाले की, जोपर्यंत चंद्र-सूर्य असे तोपर्यंत त्यागमूर्ती माता रमाईचे नाव विसरू शकत नाही. तसेच त्यांनी वस्तीगृहातील मुलावर बेतलेला उपासमारीचा एक प्रसंग ही सांगितला त्यावेळी रमाईने दागिने विकून त्यांना जेवायला घातले. त्यापुढेही ते म्हणाले की एका यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आज जगाची ओळख झाल्याचे सांगितले. त्यांनी भारताचे संविधान लिहून सामान्यतल्या सामान्य माणसाला त्यांच्या हक्काची, सन्मानाची जाणीव करून दिली. असे मत मांडले यावेळी सौंदर्य पोटफोडे या बालिकेनेही माता रमाईच्या जीवनचरित्रावर आपले मत मांडले्. यावेळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांची उपस्थिती होती तसेच नवनिर्वाचित नगरसेवक सौ.दिपाली मोरे, सुलोचना काकडे,सौ. अनुराधा काळे, अभिषेक सौदे, सुहास खराणे,राहुल लोहबंदे यांची उपस्थिती होती तर रमाई जयंती सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा तुळसाबाई गजभारे, उपाध्यक्ष गंगाबाई गजभारे, सचिव सत्यभामा गजभारे, सत्वशीला गजभारे, कोषाध्यक्ष प्रज्ञा गजभारे, सहसचिव सरस्वती पोवळे, सोदरबाई गजभारे,संघटक लताबाई शिंगाडे, गयाबाई गजभारे, मुक्ताबाई गजभारे, अनिता गजभारे व समस्त समाज बांधव वसरणी यांनी परिश्रम घेतले

# स्मशानभूमी जागेवरील अतिक्रमण हटवण्याच्या मागणीसाठी नरंगलवासीयांचे आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ९ फेब्रूवारी-**

तालुक्यातील नरंगल (बु) येथील स्मशानभूमीच्या जागेवर सुरू असलेल्या अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामाविरोधात आज दि ९ जानेवारी रोजी नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास प्रारंभ केला आहे. गावाच्या गायरान गावठाण जमिनीत असलेल्या पारंपरिक समशानभूमीवर होत असलेल्या अतिक्रमणाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

नरंगल (बु) येथील गट क्रमांक ५०५ या जमिनीवर पूर्वीपासून गावाची जुनी समशानभूमी अस्तित्वात आहे. मात्र गावातील दोन व्यक्तींनी या जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम सुरू केल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. याबाबत ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी तोंडी व निवेदने सादर करून माहिती दिली होती. तरीही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने शेवटी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. स्मशानभूमी ही गावाची सामूहिक व धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची जागा असून तिच्यावर अतिक्रमण होणे ही गंभीर बाब आहे. संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून ही जागा पूर्वीप्रमाणे समशानभूमी म्हणून कायम ठेवावी, अशी ठाम मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.



या आमरण उपोषणासंदर्भात हजार गंगाधर पाटील, अंबादास पाटील, सतीश पाटील, सुभाष गुडफळे, इरवंत जिरगे, लक्ष्मण मुस्तापुरे, रामराव तंबाके, अशोक कत्ते, संजय खंधारे, गंगाधर मुस्तापुरे, मारुती एकलारे, गणेश स्वामी, काशिनाथ स्वामी, नरेश पांचाळ, गंगायप्पा स्वामी, लक्ष्मण जिरगे यांच्यासह आदीं ग्रामस्थांच्या सह्या असलेले निवेदन प्रशासनास देण्यात आले आहे. देगलूर येथील उपोषण स्थळी भाजपाचे जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर, माजी पंचायत समिती सभापती माधव मिसाळे (गुरुजी), शिवा संघटनेचे मजगे, पिंटू पाटील आचेगावे आदींनी भेट दिली. या प्रश्न मार्गी लावू, असे भेटी घेणारे कार्यकर्ते आणि नेत्यांनी सांगितले.

# बंगळुरू येथील इस्त्रोच्या भेटीसाठी अर्जुन पवारची निवड !

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ९ फेब्रूवारी-**

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागातील तांदळा येथील तथा सध्या यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील आमणी येथील टी.जी. देशमुख माध्यमिक आश्रमशाळा येथे इयत्ता नववीत शिकत असलेल्या अर्जुन पवार या विद्यार्थ्याची महाराष्ट्र राज्य इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय परीक्षेतून बंगळुरू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) भेटीसाठी निवड झाली आहे. या गगनभरारी निवडीमुळे माहूरसह महागाव तालुक्यातील शिक्षण क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याबद्दल अर्जुन याचे सर्व स्तरातून जोरदार अभिनंदन होत आहे.



लहानपणीच वडिलांचे छत्र हरवलेल्या अर्जुन नारायण पवार याची आई मोलमजुरी करते तर मोठा भाऊ बारावीत शिक्षण घेत आहे. शिक्षणाची आवड असल्याने आई मालाबाई पवार हिच्याकडे जिद्द धरत अर्जुन त्याने इयत्ता नववीत आमणी तालुका महागाव येथील टी श.जी. देशमुख माध्यमिक आश्रम शाळा येथे प्रवेश घेतला. शिक्षण सुरू असतानाच महाराष्ट्र राज्य इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय निवड परीक्षेतून भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) बेंगलोर येथे भेटीसाठी त्यास पात्र ठरविण्यात आले.

या भेटीचा संपूर्ण खर्च राज्य शासनामार्फत करण्यात येणार असून, अर्जुन पवार या गुणवंत विद्यार्थ्यांने आपली अभ्यासूवृत्ती,बुद्धिमत्ता, सराव, कठोर मेहनत व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन करून शाळेचे, पालकाचे आणि संपूर्ण तांदळा गावासह माहूर व महागाव तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.या विशेष उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षकवृंद,ग्रामपंचायत कार्यालय तांदळाचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी,पोलीस पाटील,तंटामुक्ती समिती अध्यक्ष व सर्व ग्रामस्थांच्या वतीने अर्जुन नारायण पवार या भावी शास्त्रज्ञाचे भरभरून कौतुक करत, शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.अर्जुनचे हे यश गावातील इतर होतकरू विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर महसूल प्रशासनाची कारवाई

**तभा वृतसेवा**
**हदगाव , दि. ९ फेब्रूवारी-**

हदगाव शहरासह तालुक्यात होत असलेल्या अवैध वाळूच्या वाहतुकी विरोधात सय्यद उमर तहसीलदार, हदगाव यांनी कडक भूमिका घेत कारवाई करण्याबाबत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक पथक नेमून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या तदनंतर दि.५ फेब्रुवारीला येळंब ता. हदगाव येथे व दि.९ फेब्रुवारी रोजी पळसा ता. हदगाव येथे अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टर वरती कारवाई करण्यात आली असून यामुळे हदगाव तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीचे तांडव माजवणाऱ्यांवरती चांगलीच जरब बसली असून यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.



अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी नेमलेल्या पथकास दि.५ फेब्रुवारी २०२६ रोजी येळंब ता. हदगाव येथे रेतीने भरलेला विना नंबरचा ट्रॅक्टर आढळून आला असता चालकाकडे परवानगी व रॉयल्टी ची विचारणा केली असता त्याकडे कुठलेही परवानगी व रॉयल्टी नसल्याने पुढील कारवाईसाठी सदर वाहन तहसील कार्यालय हदगाव येथे लावण्यात आले तर दि.९ फेब्रुवारी रोजी पळसा ता. हदगाव येथे ट्रॅक्टर क्र.एम. एच.२६ बी एक्स ३९६७ याच्यात रेती आढळल्याने पथकांनी त्यांच्याकडे परवानगी व रॉयल्टी ची विचारणा केली असता त्याकडे सुद्धा कोणती परवानगी व रॉयल्टी आढळून आल्याने पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालय हदगावच्या आवरात लावण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली असून सदरील कारवाई सय्यद उमर तहसीलदार हदगाव ,मुगाजी काकडे नायब तहसीलदार, अनिल तामसकर नायब तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुखातील कर्मचारी यांनी पार पाडली.



**आदमपूर-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर, गळेगांव, थडीसावळी,खतगांव, मुतन्याळ,केसराळी आदि परिसरातील शेत शिवारात करडईचे पीक पिवळ्या,केशरी भरघोस काटेरी फुलांनी डवरले आहे.**